वर्ष: 7 अंक: 04

16-31 ऑगस्ट, 2026 (निःशुल्क)

न्यू इंडिया समाचार

आम्हाला फॉलो करा @NISPIBIndia

जन-धन ते जन-गण-मन पर्यंत

महिला सक्षमीकरणापासून ते थेट लाभ हस्तांतरणापर्यंत (डीबीटी), बँकिंग, विमा आणि पेन्शन सुरक्षा ते डिजिटल पेमेंटमधील क्रांतीपर्यंत— 12 वर्षांच्या प्रवासात 'जन-धन योजने'च्या पाच स्तरीय प्रभावाने 'जन' ला 'जन-गण-मन' म्हणजेच राष्ट्रीय चेतना आणि प्रतिष्ठेशी देखील जोडले आहे...

भारताची संरक्षण उपकरणे आणि तंत्रज्ञान यावर जगाचा विश्वास वाढत आहे

'मन की बात' मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी देशातील अशा काही उल्लेखनीय कामगिरीबद्दल चर्चा करतात ज्यामुळे देशवासियांचा ऊर अभिमानाने भरून येतो. पंतप्रधान मोदी यांनी 'मन की बात 'च्या 136 व्या भागाची सुरुवात कारगिल विजय दिवसाच्या वीरांना वंदन करून केली. मध्य प्रदेशच्या सीधी जिल्ह्यातील जल संवर्धन मोहिमेचे कौतुक केले. स्वदेशी संरक्षण उपकरणे आणि विविध ऑलिम्पियाड मधील देशाच्या कामगिरीचाही त्यांनी उल्लेख केला. सादर आहे 'मन की बात' मधील संपादित अंश ...

- **'शौर्य विजय यात्रा' :** 14 जुलै रोजी दिल्लीच्या राष्ट्रीय युद्ध स्मारक येथून सुरू झालेली शौर्य विजय मोटरसायकल यात्रा द्रास येथील कारगिल युद्ध स्मारकापर्यंत पोहोचेल. याचा संदेश आहे - "वन राइड, वन नेशन, वन सॅल्यूट"
- **आत्मनिर्भर भारत :** भारतीय नौदलाच्या ताफ्यात 'आयएनएस महेंद्रगिरी' ही युद्धनौका समाविष्ट करण्यात आली. या आधुनिक भव्य जहाजाची रचना भारतातच केली आहे . यात 75 टक्क्यांहून अधिक स्वदेशी साहित्याचा वापर झाला आहे . हे 'आत्मनिर्भर भारत'च्या वाढत्या शक्तीचे प्रतीक आहे.
- **सामूहिक परिश्रम :** डीआरडीओ ने 'पिनाका लाँग रेंज गायडेड रॉकेट', या लांब पल्ल्याच्या मार्गदर्शित क्षेपणास्त्र प्रक्षेपकाची यशस्वी चाचणी केली. या यशामागे आपल्या शास्त्रज्ञांचे आणि अभियंत्यांचे सामूहिक परिश्रम आहेत.
- **नवी उंची :** आज संरक्षण उत्पादन असो, संरक्षण निर्यात असो किंवा मित्र देशांसोबत राजकीय सहकार्य असो – भारत सातत्याने नवी उंची गाठत आहे. भारताची संरक्षण उपकरणे आणि तंत्रज्ञानावरील जगाचा विश्वास वाढत आहे.
- **'कॅच द रेन' :** 'कॅच द रेन' मोहिमेत पावसाचा प्रत्येक थेंब साठवून ती लोकचळवळ बनवा . 'कॅच द रेन'चा संदेश अतिशय सोपा आहे – जिथे पाऊस पडेल, जेव्हा पाऊस पडेल, पाणी तिथेच साठवा.
- **देशासाठी अभिमानास्पद :** पी. व्ही. सिंधू जपान खुल्या बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद पटकावणारी पहिली भारतीय खेळाडू ठरली . तिच्या या ऐतिहासिक यशाचा संपूर्ण देशाला अभिमान आहे. भारतीय महिला क्रिकेट संघानेही लंडनमधील लॉर्ड्स मैदानावर खेळण्यात आलेला पहिला महिला आंतरराष्ट्रीय कसोटी सामना जिंकला आहे. हा एक ऐतिहासिक विजय आहे.
- **विक्रम-1 :** 'विक्रम-1'च्या यशस्वी प्रक्षेपणानं प्रत्येक देशवासीयाचा ऊर अभिमानाने भरून आला आहे. आपण सर्वजण भारतीय अंतराळ क्षेत्रातील या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार बनलो. खाजगी क्षेत्राद्वारे विकसित हे भारताचे पहिले रॉकेट आहे.
- **ऑलिम्पियाड :** भारतीय संघाने भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि गणित ऑलिम्पियाडमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत अनेक सुवर्ण आणि रौप्य पदके जिंकली.
- **युवा शक्ती :** मला देशाच्या युवा शक्तीचा खूप अभिमान वाटतो. भारतात ऑलिम्पियाड्स आणि हॅकाथॉनची संस्कृती निरंतर वाढत आहे हे पाहून आनंद होतो. मला पूर्ण विश्वास आहे की, देशातील अधिकाधिक तरुण अशा व्यासपीठांवर आपले कौशल्य सिद्ध करतील आणि जगभर भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवतील.
- **'वेस्ट टू वेल्थ' :** बिहारच्या सीतामढीमध्ये 'वेस्ट टू वेल्थ' (कचऱ्यापासून उपयुक्त निर्मिती) अंतर्गत कचऱ्यावर पुनर्प्रक्रिया करून त्यापासून आकर्षक बाकडी बनवली जात आहेत. हा प्रयत्न आपल्याला सांगतो की रिड्यूस, रियूज आणि रिसायकल (कमी वापर-पुनर्वापर-पुनर्प्रक्रिया) ही आज केवळ एक घोषणा नाही तर आपल्या जीवनाचा भाग बनत चालली आहे.
- **लोकटाल तलाव :** ॲस्ट्रोफिजिसिस्ट (खगोलभौतिकशास्त्रज्ञ) डॉ. रोनाल्डो लैशराम यांनी 'यंग गॅलक्सीज' या आकाशगंगांच्या विशाल समूहाचे नाव मणिपूरच्या प्रसिद्ध लोकटाल तलावाच्या नावावरून ठेवले आहे, जो गोड्या पाण्याचा एक खूप मोठा तलाव आहे . ही कामगिरी प्रत्येक भारतीयाचा अभिमान वाढवणारी आहे.
- **खादीची विक्री :** गेल्या 12 वर्षांमध्ये खादीची विक्री 6 पटीने वाढली आहे. विक्रीचा हा आकडा आता 8,000 कोटी रुपयांच्या जवळ पोहोचला आहे. माझे तुम्हा सर्वांना आवाहन आहे की आगामी सणासुदीच्या दिवसांत खादी, हातमाग किंवा हस्तकलेचे कोणते ना कोणते उत्पादन नक्की खरेदी करा.

'मन की बात' संपूर्ण ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

न्यू इंडिया
समाचार

वर्ष: 7, अंक: 04 । 16-31 ऑगस्ट, 2026

मुख्य संपादक
धीरेंद्र ओझा
प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय , नवी दिल्ली

मुख्य सल्लागार संपादक
संतोष कुमार

वरिष्ठ सहाय्यक सल्लागार संपादक
पवन कुमार

सहाय्यक सल्लागार संपादक
अखिलेश कुमार
चंदन कुमार चौधरी

भाषा संपादक
सुमित कुमार (इंग्रजी)
रजनीश मिश्रा (इंग्रजी)
नदीम अहमद (उर्दू)

वरिष्ठ डिझायनर
फूलचंद तिवारी

डिझायनर
अभय गुप्ता
सत्यम सिंह

13 भाषांमध्ये उपलब्ध न्यू इंडिया समाचार वाचण्यासाठी येथे क्लिक करा.

https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

न्यू इंडिया समाचारचे जुने अंक वाचण्यासाठी क्लिक करा.

https://newindiasamachar.pib.gov.in/archive.aspx

न्यू इंडिया समाचार बद्दल नियमित अपडेटसाठी फॉलो करा:-@NISPIBIndia

आतील पानांवर...

मुखपृष्ठ कथा

गेल्या 12 वर्षांमध्ये एखाद्या योजनेने देशाचा विकासाचा दृष्टिकोन आणि दिशा बदलून आर्थिक क्रांतीची सुरुवात केली असेल तर ती आहे 12 वर्षांपूर्वी 28 ऑगस्ट 2014 रोजी सुरू झालेली 'प्रधानमंत्री जन-धन योजना' . आता आर्थिक ,सामाजिक आणि तांत्रिक सक्षमीकरणाच्या दिशेने जन-धन योजनेच्या रूपाने पेरलेल्या त्या बीजाचा एक विशाल वटवृक्ष झाला आहे, ज्याने बहुस्तरीय प्रभाव आणि परिवर्तनासह उमटवला आहे अमिट ठसा... | 8-21

रेल्वे वाहतुकीचे भविष्य...
हायड्रोजन ट्रेन

जिंद येथून सुमारे 14,700 कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची भेट | 22-23

वृत्त सार | 4-5

भव्य -रसायन योजनेला मंजुरी , सुरु राहणार पीएम किसान योजना
केंद्रीय मंत्रिमंडळाचा महत्वपूर्ण निर्णय | 6-7

तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि आरोग्यसेवा , विकसित भारताचा मजबूत पाया
पंतप्रधान मोदी यांनी चंदीगडला 4,700 कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या विकास प्रकल्पांची दिली भेट | 24-25

देशाच्या सर्वांगीण विकासातील भागीदार... खेळांची ताकद
राष्ट्रीय क्रीडा दिन आणि 'फिट इंडिया'च्या सातव्या वर्धापनदिनानिमित्त विशेष लेख | 30-33

भारताने जिंकली 13 सुवर्णपदकांसह एकूण 39 पदके
राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा 2026 मध्ये भारतीय खेळाडूंनी उंचावले देशाचे नाव मान | 34-35

'आर्टिकल 370' ला मिळाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार
वर्ष 2024 साठी 72 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा | 36-37

व्यक्तिमत्व वीरांगना अवंतीबाई लोधी
ज्यांनी आत्मसमर्पणाऐवजी निवडले आत्मबलिदान | 38



प्रकाशक : कंचन प्रसाद, महासंचालक, सीबीसी (केंद्रीय संचार ब्युरो) **पत्र व्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता :** खोली क्रमांक -1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली- 110003. **ईमेल - response-nis@pib.gov.in, आर. एन. आय . क्रमांक DELHIN/2020/78812**

संपादकांच्या लेखणीतून...

जन- धन योजना

आर्थिक सक्षमीकरणाची यशस्वी 12 वर्षे

सप्रेम नमस्कार ,

वित्तीय समावेशनाच्या दिशेने भारताच्या सर्वात जुन्या उपक्रमांपैकी एक असलेल्या 'प्रधानमंत्री जन-धन योजने'ला 28 ऑगस्ट रोजी 12 वर्षे पूर्ण होत आहेत. या 12 वर्षांमध्ये ही योजना भारताच्या सामाजिक-आर्थिक जीवनाचा एक अविभाज्य भाग बनली आहे , जिने कोट्यवधी कुटुंबांच्या आयुष्यात आर्थिक व्यवहार सुलभ बनवले आहेत.

या प्रवासात पाच मोठे बदल स्पष्टपणे दिसून येत आहेत. पहिला आहे, वित्तीय समावेशन ज्या अंतर्गत देशभरात 58 कोटींहून अधिक जन-धन खाती उघडण्यात आली. दुसरा , महिला सक्षमीकरण , ज्याअंतर्गत, यापैकी अर्ध्याहून अधिक म्हणजेच 32.72 खाती महिलांच्या नावे उघडण्यात आली; ज्यामुळे घरातील आर्थिक निर्णयांमध्ये ती समान भागीदार बनली. तिसरा, थेट लाभ हस्तांतरण, ज्याने अनुदानात होणारे घोटाळे रोखून लाभ थेट लाभार्थींपर्यंत पोहचवले. चौथा, विमा आणि निवृत्तीवेतन सुरक्षा , जिने गरीब आणि वंचित कुटुंबांना एक सुरक्षा कवच दिले. आणि पाचवा, डिजिटल पेमेंट क्रांती , ज्यामध्ये रूपे कार्ड आणि युपीआयने रोकडरहित अर्थव्यवस्था गावांपर्यंत पोहचवली.

या बदलांचा प्रभाव केवळ आकडेवारीमध्ये नाही, तर सामान्य लोकांचा आत्मविश्वास आणि प्रतिष्ठेमध्ये दिसून येतो. आणि ती प्रत्येक व्यक्ती जी प्रथमच बँकिंग व्यवस्थेशी जोडली गेली, ती आज देशाच्या मुख्य प्रवाहातील अर्थव्यवस्थेची सक्रिय भागीदार आहे.

हेच जनधन योजनेचे सर्वात मोठे यश आहे. तिने सर्वसामान्य माणसाला केवळ एका बँक खात्याशी नाही तर राष्ट्रनिर्मितीच्या त्या भावनेशी जोडले आहे ज्याला आपण 'जन- गण - मन ' म्हणतो. ही केवळ एक योजना नाही, तर एका आत्मनिर्भर बनणाऱ्या राष्ट्राची गाथा आहे आणि हीच यावेळी आमच्या अंकाची मुखपृष्ठ कथा बनली आहे.

याव्यतिरिक्त, व्यक्तिमत्व या विशेष मालिकेमध्ये आत्मसमर्पण ऐवजी हौतात्म्य पत्करणाऱ्या वीरांगना अवंतीबाई लोधी ,72 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा आणि केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतलेले निर्णय यांचाही समावेश आहे. त्याचबरोबर, 29 ऑगस्ट रोजी साजरा केला जाणारा राष्ट्रीय क्रीडा दिन आणि 'फिट इंडिया' मोहीम, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा 2026 मधील भारताची दमदार कामगिरी आणि 23 ऑगस्टच्या राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त विशेष लेखांसह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गेल्या पंधरा दिवसांतील कार्यक्रमांचा यात समावेश करण्यात आला आहे.

याव्यतिरिक्त, मासिकाच्या आतील पानांवर 'मन की बात' आणि मलपृष्ठावर 16 ऑगस्ट रोजी भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त विशेष लेख समाविष्ट आहे.

तुम्ही तुमच्या सूचना आम्हाला पाठवत राहा.

(धीरेंद्र ओझा)

हिंदी, इंग्रजी आणि इतर 11 भाषांमध्ये उपलब्ध असलेले हे पाक्षिक वाचा/ डाउनलोड करा.
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

तुमच्या प्रतिक्रिया...

रंजक आणि महत्त्वपूर्ण माहिती पुरवते न्यू इंडिया समाचार पाक्षिक

माझे नाव पवन कुमार आहे. मी स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहे. 'न्यू इंडिया समाचार' हे पाक्षिक माझ्या ज्ञानात भर घालते. त्यातून रंजक आणि महत्त्वपूर्ण माहिती मिळते. महत्त्वाच्या पाक्षिक घडामोडींचे आणि सरकारी योजनांचे सखोल विश्लेषण माझ्या साधक-बाधक विचारांना चालना देते.

pawankumarpanwar2003@gmail.com

कृषी, उद्योग, विज्ञान आणि तंत्रज्ञान संबंधी मिळते माहिती

मी 'न्यू इंडिया समाचार ' पाक्षिकाच्या टीमला शुभेच्छा देतो. मी या पाक्षिकाचा नियमित वाचक आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मला हे पाक्षिक मेलद्वारे विनामूल्य मिळत आहे. माझ्या गावातील लोक हे पाक्षिक वाचतात आणि त्यातील माहितीचा लाभ घेतात. राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी हा एक उपयुक्त मार्गदर्शक अंक आहे. यामुळे आमच्या विद्यार्थ्यांना विविध योजना, महिला सक्षमीकरण, कृषी, उद्योग तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान यांविषयी माहिती मिळवण्यास मदत झाली आहे.

babitaborthakur59170@gmail.com

दर्जेदार आशय निर्मितीचा प्रयत्न कौतुकास्पद

मला वाटते की, 'न्यू इंडिया समाचार 'च्या पाक्षिकात सामान्य जनतेला योगदान देता येईल असा एखादा छोटा विभाग किंवा सदर सुरू करण्याबाबत विचार करणे फायदेशीर ठरेल. यामुळे सामान्य जनतेला त्यांचे ज्ञान, अनुभव, सर्जनशील लेखन किंवा महत्त्वाच्या सामाजिक मुद्द्यांवरील मते मांडण्याची संधी मिळेल.

अशा स्तंभामुळे केवळ वाचकांशी नाते जोडण्यासच मदत होणार नाही, तर प्रकाशनात विविध आणि वास्तववादी दृष्टिकोनही मांडता येईल. या उपक्रमामुळे समुदायाची एक मजबूत भावना निर्माण होऊ शकेल. हे पाक्षिक अधिक विश्वासार्ह व सर्वसमावेशक बनेल. दर्जेदार आशय निर्मिती करण्याच्या तुमच्या टीमच्या प्रयत्नांची मी प्रशंसा करतो. मला आशा आहे की, या कल्पनेमुळे नक्कीच मोलाची भर पडेल.

शालिनी भटनागर

sbhatnagar1971@gmail.com

वाचण्यासाठी उत्सुक असतो ...

मी 'न्यू इंडिया समाचार' या पाक्षिकाचा नियमित वाचक आहे. मला हे मासिक अतिशय उत्कृष्ट वाटते; यातून मला अद्ययावत माहिती मिळते. मी नेहमीच हे पाक्षिक वाचण्यास उत्सुक असतो. याच्या वाचनामुळे मला जटिल मुद्दे सहजपणे समजण्यास मदत होते.

kumar.mohan5699@gmail.com

पत्रव्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता: खोली क्रमांक 1077,सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली- 110003

ईमेल- response-nis@pib.gov.in

दृष्टिक्षेप

भारतामध्ये डेंग्यूवरील पहिल्या लसीला मंजुरी

भारत सरकारच्या केंद्रीय औषध मानक नियंत्रण संस्थेने (सीडीएससीओ) डेंग्यूच्या प्रतिबंधासाठी 'कुडेंगा' या डेंग्यू टेट्राव्हॅलेंट लसीच्या (लाईव्ह, एटेन्यूएटेड) विक्रीस मान्यता दिली आहे. ही लस जर्मनीतील टाकेदा जीएमबीएच कंपनीने तयार केली आहे. डेंग्यू रोगाच्या प्रतिबंधासाठी भारतात मान्यता मिळालेली ही पहिली लस आहे. या डेंग्यू लसीला जागतिक आरोग्य संघटनेची पूर्व-पात्रता आणि मजबूत जागतिक सुरक्षा नोंदीसह यापूर्वीच 42 देशांमध्ये मान्यता मिळाली आहे. त्या देशांमध्ये आजपर्यंत या लसीचे 24 दशलक्षाहून अधिक डोस वितरित करण्यात आले आहेत. सीडीएससीओच्या मते, लसीची गुणवत्ता, सुरक्षितता आणि परिणामकारकता यांचे सर्वसमावेशक वैज्ञानिक मूल्यांकन केल्यानंतर ही मान्यता देण्यात आली आहे. 'कुडेंगा' ही डेंग्यू टेट्राव्हॅलेंट लस (लाईव्ह, एटेन्यूएटेड) 4 ते 60 वर्षे वयोगटातील व्यक्तींमध्ये डेंग्यू रोगाचा प्रतिबंध करण्यासाठी तीन महिन्यांच्या अंतराने (महिना 0 आणि 3) दोन डोसमध्ये दिली जाते.

सेवानिवृत्त अग्निवीरांसाठी आरक्षण

केंद्र सरकारने विविध पदांच्या भरतीमध्ये अग्निवीरांना आरक्षण आणि सवलती देण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमांतर्गत, सरकारने केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि आसाम रायफल्समधील कॉन्स्टेबल पदांच्या भरतीसाठी माजी अग्निवीरांसाठी एक नवीन प्रवर्ग तयार केला आहे. या प्रवर्गांतर्गत रिक्त जागांमध्ये 50% आरक्षण आणि विहित कमाल वयोमर्यादेत 3 वर्षांची सवलत दिली जाईल. माजी अग्निवीरांच्या पहिल्या तुकडीतील उमेदवारांना विहित कमाल वयोमर्यादेपलीकडे 5 वर्षांची वयोमर्यादेत सवलत देखील मिळेल. अग्निवीरांना शारीरिक कार्यक्षमता चाचणी (पीइटी) आणि लेखी परीक्षेतून सूट देण्यात आली आहे.

अग्निवीरांना मिळणार रेल्वे भर्तीमध्ये आरक्षण

- रेल्वेमधील अराजपत्रित पदांवरील थेट भर्तीमध्ये अग्निवीरांसाठी वेतन स्तर-1 मध्ये 10% आणि वेतन स्तर-2 मध्ये 5% आरक्षणाची तरतूद.
- रेल्वे संरक्षण दल विभागात हवालदारांच्या भर्तीमध्ये 10% आरक्षण देण्यात येईल.

खगोलशास्त्रज्ञांनी शोधला दुर्मिळ निळा 'स्ट्रॅगलर' तारा



भारतीय खगोलभौतिकी संस्थेतील (आयआयए) शास्त्रज्ञांनी, आंतरराष्ट्रीय सहकाऱ्यांच्या मदतीने, एका दुर्मिळ 'ब्लू स्ट्रॅगलर' ताऱ्याचा शोध लावला आहे, हा तारा सध्या निर्मितीच्या प्रक्रियेत आहे. कोलिंडर 261 या तारकागुच्छामध्ये सुमारे 9,500 प्रकाशवर्षे दूर असलेल्या या ताऱ्याबद्दल अभ्यासात असे आढळून आले आहे की, तो त्याच्या बरोबरच्या ताऱ्याकडून सतत पदार्थ ग्रहण करत आहे, त्यामुळे तो अधिक उष्ण, तेजस्वी आणि अधिक वस्तुमान असलेला बनत आहे. नासाच्या टीईएसएस मोहिमेच्या आणि 'युरोपियन सदर्न ऑब्झर्व्हेटरी'च्या अतिविशाल दुर्बिणीतून केलेल्या पाहणीनंतर जमा केलेल्या माहितीद्वारे या शोधाला दुजोरा मिळाला आहे. संशोधकांना असे आढळून आले आहे की, या 'ब्लू स्ट्रॅगलर' ताऱ्याकडे 5.46 अब्ज वर्षांपूर्वी सुरू झाले होते ते वस्तुमानाचे हस्तांतरण अजूनही सुरू आहे. तसेच, या 'ब्लू स्ट्रॅगलर' ताऱ्याचे वस्तुमान सूर्याच्या वस्तुमानाच्या 1.67 पट असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

'पीएलआय'मुळे उत्पादनात वाढ

गुंतवणूक आणि निर्यातीत वाढ, 14.15 लाखांपेक्षा जास्त रोजगार निर्मिती

सरकारने उत्पादन क्षमता वाढवणे, गुंतवणूक आकर्षित करणे, निर्यातीला चालना देणे आणि रोजगार निर्मिती करणे या उद्देशाने 14 प्रमुख क्षेत्रांसाठी उत्पादन-संलग्न प्रोत्साहन (पीएलआय) योजना सुरू केल्या होत्या. या योजनांमुळे 31 मार्च 2026 पर्यंत 2.40 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक आकर्षित झाली आहे. यामुळे 14.15 लाखांपेक्षा जास्त (प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष) रोजगार निर्माण झाले आहेत. याशिवाय, या योजनांमुळे आतापर्यंत एकत्रितपणे 15.2 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त निर्यात शक्य झाली आहे.

मोबाईल उत्पादन: योजना सुरू झाल्यानंतर मोबाईल फोन उत्पादन 2.4 पटीने वाढले, आयातीत 77% घट झाली. देशात वापरले जाणारे 99.2% फोन स्वदेशी आहेत.

औषधनिर्माण: 3.64 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त विक्री झाली. 1,931 औषधांचे उत्पादन आणि 191 नवीन बल्क औषधांचे देशांतर्गत उत्पादन सुरू झाले.

वैद्यकीय उपकरणे

पीएलआयने 55 उपकरणे विकसित करून; सीटी स्कॅनर, एमआरआय, कॅथ लॅब आणि अल्ट्रासोनोग्राफी उपकरणांच्या देशांतर्गत उत्पादनाला चालना दिली.

'कुशा' क्षेपणास्त्राची यशस्वी उड्डाण चाचणी

संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीएरडीओ) 23 जुलै 2026 रोजी ओडिशाच्या किनारपट्टीजवळील एपीजे अब्दुल कलाम बेटावरून 'कुशा' या लांब पल्ल्याच्या जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्राची पहिली उड्डाण चाचणी यशस्वी झाली. ही पहिली चाचणी, उच्च वेग आणि उच्च उंचीवरील हवाई धोक्याचे अनुकरण करणाऱ्या इलेक्ट्रॉनिक लक्ष्यावर घेण्यात आली. क्षेपणास्त्र प्रणालीद्वारे हे लक्ष्य यशस्वीरित्या रोखण्यात (नष्ट करण्यात) आले. 'कुशा' क्षेपणास्त्र प्रणाली विविध पल्ल्यांवर आणि उंचीवरून लढाऊ विमाने, क्षेपणास्त्रे, मानवरहित हवाई वाहने (यूएव्ही) आणि शत्रूची मोठी विमाने यांसारख्या विविध प्रकारच्या हवाई धोक्यांना निष्प्रभ करण्यास सक्षम आहे.

आंतरराष्ट्रीय विज्ञान आणि गणित ऑलिम्पियाड 2026 मध्ये भारताची ऐतिहासिक कामगिरी

भारतीय विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि गणित ऑलिम्पियाड 2026 मध्ये अपवादात्मक कामगिरी करून जागतिक स्तरावर देशाचे वैज्ञानिक श्रेष्ठत्व दाखवून दिले आहे. भारताने यावर्षी चार ऑलिम्पियाडमध्ये 12 सुवर्ण आणि 7 रौप्य पदके जिंकली. सर्वात ऐतिहासिक कामगिरी म्हणजे भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये सहभागी झालेल्या सर्व भारतीय प्रतिनिधींनी सुवर्णपदके जिंकली. हे उल्लेखनीय यश विज्ञान आणि गणितासाठीच्या राष्ट्रीय ऑलिम्पियाड कार्यक्रमाची परिणामकारकता दर्शवते. हा कार्यक्रम अणुऊर्जा विभागाच्या सहकार्याने आणि होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राच्या सक्षम मार्गदर्शनाखाली आयोजित केला जात आहे.

जवळपास चार दशकांपासून, अणुऊर्जा विभाग देशातील सर्वात हुशार तरुण प्रतिभावंतांना शोधणे, त्यांना घडवणे आणि या मुलांना आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये यश मिळावे, यासाठी सक्षम करण्याकरिता निरंतर संस्थात्मक पाठिंबा दिला जात आहे. ही अभूतपूर्व कामगिरी भारताचे उज्ज्वल वैज्ञानिक भविष्य आणि त्याची वाढती जागतिक प्रतिष्ठा यांचा थेट पुरावा आहे. ■

केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय

भव्य रसायन योजनेला मंजुरी
पीएम किसान योजना राहणार सुरू

केंद्र सरकार देशाला रासायनिक उत्पादनात अग्रेसर बनवण्यासाठी कटिबद्ध आहे. म्हणूनच केंद्रीय मंत्रिमंडळाने 'भव्य-रसायन योजने'ला मंजुरी दिली आहे. देशाची रासायनिक आणि पेट्रोकेमिकल परिसंस्था मजबूत करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. याव्यतिरिक्त, 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम-किसान)' योजना 2026-27 ते 2030-31 पर्यंत सुरू ठेवण्यासह इतर अनेक महत्त्वाच्या प्रस्तावांनाही दिली मंजुरी...

निर्णय : देशात तीन समर्पित रासायनिक पार्क उभारण्यासाठी, 'भव्य रसायन योजना' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारत औद्योगिक विकास योजनेला मंजुरी देण्यात आली.

परिणाम: ही योजना आर्थिक वर्ष 2026-27 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आली होती. या योजनेसाठी 3,030 कोटींची तरतूद केली जाईल. ही योजना आर्थिक वर्ष 2026-27 ते आर्थिक वर्ष 2030-31 पर्यंत, पाच वर्षांसाठी राबविण्यात येईल.

- रासायनिक उद्योगाच्या वरच्या स्तरावरी तसेच जमिनीस्तरावर कार्यरत असलेले घटक आणि सहाय्यक मूल्य साखळी उद्योगांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन दिले जाईल.
- उत्पादनातील खर्चात स्पर्धात्मकता वाढेल. भारतीय रसायन उद्योग जागतिक स्तरावर अधिक स्पर्धात्मक बनेल.
- भारतीय रसायन उद्योग जागतिक मूल्य साखळींमध्ये अधिक चांगल्या प्रकारे एकीकृत होईल, त्यामुळे रसायन क्षेत्रातील निर्यातीला चालना मिळेल आणि आयातीवरील अवलंबित्व कमी होईल.
- पर्यावरणपूरक औद्योगिक परिसंस्थेच्या माध्यमातून शाश्वत आणि टिकाऊ औद्योगिक विकासाला प्रोत्साहन दिले जाईल.

मंत्रिमंडळाच्या निर्णयांवरील पत्रकार परिषद पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

निर्णय : 2026-27 ते 2030-31 पर्यंत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सुरू ठेवण्यास मान्यता.

परिणाम : पीएम-किसान योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या मदतीमुळे शेतकऱ्यांना बियाणे, खते, सिंचन, कृषी यंत्रसामग्री आणि इतर कृषी गरजांमध्ये वेळेवर गुंतवणूक करण्यास मदत होते. यामुळे शेतकऱ्यांची उत्पादकता वाढली आहे, अनौपचारिक कर्जांवरील त्यांचे अवलंबित्व कमी झाले आहे आणि ग्रामीण कुटुंबांची आर्थिक स्थिरता मजबूत झाली आहे.

- एकूण 3.15 लाख कोटी रुपयांच्या आर्थिक तरतुदीस मंजुरी देण्यात आली आहे.
- या योजनेअंतर्गत, पात्र जमीनधारक शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यांमध्ये दरवर्षी 6,000 रुपयांची आर्थिक मदत तीन समान हप्त्यांमध्ये हस्तांतरित केली जाते.
- आतापर्यंत 4.47 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम 23 हप्त्यांमध्ये थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित करण्यात आली आहे.

मंत्रिमंडळाच्या निर्णयांवरील पत्रकार परिषद पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

निर्णय : सुधारित खेलो इंडिया योजना आणि राष्ट्रीय क्रीडा महासंघांना (एएनएसएफ) वाढीव सहाय्य मंजूर.

प्रभाव : 2026-27 ते 2030-31 या कालावधीसाठी 36,441 कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद. मंजूर तरतूद ही मागील खेलो इंडिया योजनेच्या तुलनेत जवळपास आठ पटीने जास्त आहे.

- या उपक्रमामुळे क्रीडा पायाभूत सुविधा बळकट होतील आणि राष्ट्रीय क्रीडा संघटनांना मिळणाऱ्या निधीत वाढ होईल.
- खेळाडूंना जगात आपली ओळख निर्माण करता यावी, यासाठी क्षमता बांधणीकरिता निधीची व्यवस्था तसेच परदेशी तज्ञांची मदत उपलब्ध करून दिली जाईल.

निर्णय : कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील बल्लारी-गुंटकल विभागामध्ये तिसरी आणि चौथी रेल मार्गिका टाकण्याच्या प्रकल्पास मंजुरी.

परिणाम : या प्रकल्पाचा अंदाजित खर्च 1,264 कोटी आहे. हा प्रकल्प 2028-29 पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. वाढलेल्या मार्ग क्षमतेमुळे रेल्वे वाहतूक अधिक सुव्यवस्थित होईल. भारतीय रेल्वेची परिचालन कार्यक्षमता आणि सेवेची विश्वसनीयता लक्षणीयरीत्या सुधारेल. हा बहु-मार्गी प्रकल्प रेल्वे वाहतूक सुव्यवस्थित करण्यात आणि गर्दी कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल.

- रेल्वे जाळे सुमारे 46 किलोमीटरने वाढ होईल.
- यामुळे दरवर्षी 16 दशलक्ष टन अतिरिक्त मालवाहतूक क्षमता उपलब्ध होईल, परिणामी माल वाहतूक खर्चामध्ये वार्षिक अंदाजे 149 कोटी रुपयांची बचत होईल.
- सुमारे 99 गावांची रेल्वे जोडणी सुधारेल. त्याचा सात लाख लोकांना फायदा होईल.
- रेल्वे मार्गांची क्षमता वाढल्याने, बल्लारी किल्ला, श्री कुमार स्वामी मंदिर यांसारख्या देशातील अनेक प्रमुख पर्यटन स्थळांची रेल्वे जोडणी सुधारेल.
- या प्रकल्पामुळे वार्षिक सुमारे 13.2 दशलक्ष लिटर तेलाची बचत होईल. तसेच, या प्रकल्पामुळे कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन 66.7 दशलक्ष किलोग्रॅमने कमी होईल. हे अंदाजे 2.7 दशलक्ष झाडे लावण्याइतके आहे.

निर्णय : ऊर्जा साठवण प्रणालीसह फ्लोटिंग सोलर फोटोव्होल्टिक प्रकल्पांच्या विकासासाठी 'प्रधानमंत्री सूर्य सरोवर योजना (पीएम-एसएसवाय)' या योजनेला मंजुरी देण्यात आली.

परिणाम : या योजनेअंतर्गत 5,000 मेगावॅट क्षमतेचे फ्लोटिंग सोलर फोटोव्होल्टेइक प्रकल्प विकसित केले जातील.

- ही योजना नवीकरणीय ऊर्जा क्षमतेत योगदान देईल. त्यामुळे राष्ट्रीय ऊर्जा आणि हवामानविषयक उद्दिष्टे साध्य करण्यास मदत होईल.
- यामुळे जलसंपत्तीचा इष्टतम वापर सुलभ होईल आणि त्याचबरोबर विकसित भारताच्या संकल्पनेलाही चालना मिळेल.
- या योजनेमुळे सर्व राज्यांना आणि केंद्रशासित प्रदेशांना फायदा होईल आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होईल. यासाठी एकूण 5,070 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

निर्णय : 'समुद्र मंथन' - राष्ट्रीय सागरी अन्वेषण योजनेस मंजुरी.

परिणाम : समुद्र मंथन हा एक परिवर्तनकारी राष्ट्रीय उपक्रम आहे. तो देशाच्या सागरी ऊर्जा संसाधनांचा वापर करेल, दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षा मजबूत करेल, तांत्रिक क्षमता वाढवेल आणि अर्थव्यवस्था तसेच भावी पिढ्यांसाठी चिरस्थायी मूल्य निर्माण करेल.

- या योजनेमुळे सागरी अन्वेषण कार्यात लक्षणीय वाढ होईल, देशांतर्गत तेल आणि वायू उत्पादनाला चालना मिळेल आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होईल.
- तसेच, 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' अंतर्गत देशांतर्गत उत्पादन मजबूत केले जाईल.
- 2030-31 या आर्थिक वर्षापर्यंत या योजनेसाठी 84,084 कोटी रुपयांची रक्कम मंजूर करण्यात आली.

देशभरातील आपल्या शेतकरी बांधवांच्या सक्षमीकरणासाठी आणि समृद्धीसाठी आम्ही कटिबद्ध आहोत. या दिशेने, पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना 2030-31 पर्यंत वाढवण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्यांना बियाणे, खते आणि शेतीसंबंधित इतर गरजा भागवण्यास मदत तर होतेच, शिवाय त्यांची आर्थिक परिस्थितीही सुधारते. ***- नरेंद्र मोदी, पंतप्रधान***

जन धन योजनेची
मुखपृष्ठ कथा 12 वर्षे

जन -धन योजना

लोककेंद्रित आर्थिक उपक्रम सर्वसमावेशक विकासाचा पाया

गेल्या 12 वर्षांत, जर कोणत्या योजनेने देशाच्या विकासाचा विचार आणि दिशा यांच्यामध्ये परिवर्तन करून आर्थिक क्रांती घडवून आणली असेल, तर ती योजना म्हणजे, 28 ऑगस्ट 2014 रोजी सुरू झालेली प्रधानमंत्री जन- धन योजना. ही योजना लोकांना सक्षम करण्यासाठी आणि देशाच्या आर्थिक संसाधनांचा उपयोग गरीबांच्या फायद्यासाठी व्हावा यासाठी तयार करण्यात आली आहे. जन-धन योजना ही आर्थिक, सामाजिक आणि तांत्रिक सक्षमीकरणाचे बीज बनली आहे या योजनेचा बहुस्तरीय प्रभाव दिसून येत आहे; त्याचबरोबर योजनेने उमटवला आहे परिवर्तनासह एक चिरस्थायी ठसा...

1

छत्तीसगडमधील जशपूर जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या लीला बाई पोर्टे यांच्या कुटुंबात सहा सदस्य होते. त्यांचे कुटुंब शेतमजुरी करून आपला उदरनिर्वाह करत असे. ही 2015 मधील गोष्ट आहे, कर्मातिकरा हे गाव बँकेपासून सात किलोमीटर अंतरावर होते आणि त्यांचे बँकेत खातेही नव्हते. बँकेतील एक मित्र गावात आला आणि त्याने त्याच्या छोट्या मशीनने खाते उघडले. नंतर, त्यांनी जीवन ज्योती विम्याचा अर्ज भरला. त्याच वर्षी उष्माघाताने त्यांच्या पतीचे निधन झाले. त्या असहाय्य, मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या त्रस्त होत्या. जेव्हा त्यांनी बँक मित्र अधिकाऱ्याला याबद्दल सांगितले, तेव्हा त्यांनी लीला बाईंना सामाजिक सुरक्षा योजनेअंतर्गत विम्याची माहिती दिली. घरी परतल्यावर त्यांनी एक अर्ज भरून कार्यालयात पाठवला आणि त्यांच्या खात्यात 2 लाख रुपये जमा झाले. या कठीण काळात मिळालेली आर्थिक मदत लीला बाईंसाठी आधार ठरली.

2

मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर येथील पनिहार गावातील रहिवासी गजेंद्र सिंग यांनी ऑगस्ट 2014 मध्ये प्रधानमंत्री जन धन योजनेअंतर्गत (PMJDY) खाते उघडले. त्यापूर्वी, त्यांचे स्वतःचे बँक खाते नव्हते किंवा त्यांना बँकिंग प्रणालीचे ज्ञानही नव्हते. ते एक अल्पभूधारक शेतकरी आहेत. सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या बराई शाखेत खाते उघडल्यानंतर गजेंद्र सिंग यांनी त्याचा वापर सुरू केला. त्यांनी आपल्या आसपासच्या गावांमध्ये जन धन खात्यांच्या फायद्यांविषयी जनजागृतीही केली. त्यामुळे आर्थिक समावेशनाबद्दलची त्यांची जागरूकताही वाढली आहे.

आत्मसंतोष, आत्मसन्मान आणि आत्मिक अभिमानाची अनुभूती देणाऱ्या प्रधानमंत्री जन-धन योजनेच्या लाभार्थ्यांच्या अशा यशोगाथा केवळ बँक खाते उघडण्यापुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. गेल्या 12 वर्षांत या योजनेने सामाजिक-आर्थिक परिस्थितीत झालेल्या परिवर्तनकारी बदलांच्या युगाची साक्ष दिली आहे. कोणत्याही समाजात क्रांतिकारी बदलांमागे एक सशक्त अर्थव्यवस्था हीच प्रेरक शक्ती असते आणि त्या अर्थव्यवस्थेतील आर्थिक सुरक्षिततेचा सर्वात पहिला आधार म्हणजे बँक खाते होय. जन-धन योजनेचा प्रभाव केवळ बँक खाते उघडण्यापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर गेल्या 12 वर्षांच्या प्रवासात या योजनेने अनेक स्तरांवर सखोल आणि चिरस्थायी बदल घडवून आणले आहेत. या योजनेने सामाजिक, आर्थिक, तांत्रिक आणि जागतिक क्षेत्रांमध्ये भारताची प्रतिमा बदलून टाकली आहे.

15 ऑगस्ट 2014 रोजी, गरीब आणि बँकिंग सुविधा नसलेल्या लोकांना बँकिंग आणि आर्थिक मदतीशी जोडून त्यांना गरिबीच्या चक्रातून बाहेर काढण्याच्या उद्देशाने एक योजना जाहीर करण्यात आली. ही योजना जाहीर झाल्याच्या अवघ्या 15 दिवसांतच अंमलात आणली गेली. लोककेंद्रित आर्थिक उपक्रमाचा आधारस्तंभ असलेल्या या योजनेने, 'प्रत्येक कुटुंबा'च्या पलीकडे जाऊन 'प्रत्येक प्रौढ व्यक्ती'चे खाते असल्याची खात्री केली आहे. एक छोटासा प्रयत्न—जन-धन खाते मिळाल्यानंतर त्यातून स्वाभिमान जागृत झाला. लाखो-करोडो रुपयांची बचत उभारण्यात गरीब वर्गही आता पुढे आला आहे. जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2014 मध्ये केंद्र सरकारचा कार्यभार स्वीकारला, तेव्हा त्यांनी देशाच्या व्यवस्थेचा बारकाईने अभ्यास केला.

प्रधानमंत्री जन धन योजना एक दृष्टिक्षेप

एकूण जन धन खाती
(8 जुलै 2026 पर्यंत)
58.70
कोटी

ग्रामीण आणि निमशहरी खात्यांचा वाटा
सुमारे
78%

जारी केलेले रुपे कार्ड
सुमारे
41 कोटी

महिला खातेधारकांचा वाटा
सुमारे
56%

एकूण ठेवी अंदाजे
सुमारे
3.10
लाख कोटी रुपये

शून्य शिल्लक खात्यांमध्ये घट



सुशासनाच्या आपल्या पूर्वानुभवाचा उपयोग करून आणि दीर्घकालीन विचारसरणीच्या आधारे, त्यांनी देशातील शेवटच्या व्यक्तीला सक्षम करण्यासाठी आणि त्यांच्याकरता आर्थिक सुरक्षा कवच निर्माण करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने पावले उचलली. प्रधानमंत्री जन-धन योजना या संपूर्ण उपक्रमाचा आधार ठरली. बँकांना गरीबांच्या दारापर्यंत घेऊन जाण्याचा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. देशातील जनतेचा पैसा, त्यांच्या हक्काचा पैसा त्यांनाच मिळायला हवा. या दिशेने व्यापक विचार करून केंद्र सरकारने जन-धन खाती, आधार आणि मोबाईल यांची अशी त्रिशक्ती उभी केली की ज्यामुळे गरिबांच्या पैशाची लूट थांबली. आता घरकुलासाठी मिळणारा निधी असो किंवा गॅस अनुदान, मनरेगाचा पैसा असो किंवा किसान सन्मान निधी—सर्व रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होऊ लागली. म्हणजेच, सर्वांना थेट लाभ आणि त्यात कोणताही भेदभाव नाही. त्यानंतर लाभार्थ्यांना अधिक सक्षम करण्यासाठी स्टँड-अप, स्टार्ट-अप आणि मुद्रा यांसारख्या योजनांशी त्यांना जोडण्याची यंत्रणा विकसित करण्यात आली. म्हणजेच, आर्थिक आणि सामाजिक सुरक्षिततेचे कवच प्रदान करण्याबरोबरच नागरिकांना उद्योजकतेच्या दिशेने घेऊन जाणाऱ्या विविध योजनांचा आधारस्तंभ प्रधानमंत्री जन-धन योजना बनली आहे.

एक काळ असा होता की गरीब बँक खात्याचा काय उपयोग करणार अशी देशाची विचारसरणी होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 68 वर्षांपर्यंत 68 टक्के लोकसंख्या बँकिंग प्रणालीपासून वंचित होती. 1969मध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतरही, 2014 पर्यंत परिस्थिती अशी होती की

पीएमजेडीवाय खात्यांची वैशिष्ट्ये आणि निःशुल्क मिळणाऱ्या गोष्टी

- पीएमजेडीवाय योजनेची खाती ही मूलभूत बचत बँक ठेव खाती (बीएसबीडी) आहेत. पूर्णपणे केवायसी-अनुरूप पीएमजेडीवाय खात्यांमध्ये शिल्लक रकमेवर किंवा व्यवहाराच्या रकमेवर कोणतेही निर्बंध नसतात.
- बँकेच्या शाखेत तसेच एटीएम/सीडीएममध्ये रोख रक्कम जमा करणे.
- कोणत्याही इलेक्ट्रॉनिक माध्यमातून किंवा केंद्र / राज्य सरकारने जारी केलेल्या धनादेशाच्या जमा / वसुलीद्वारे रक्कम प्राप्त होणे किंवा खात्यात जमा होणे.
- एका महिन्यात जमा करता येणाऱ्या रकमेवर किंवा तिच्या मूल्यावर कोणतीही मर्यादा नाही.
- एका महिन्यात किमान चार वेळा विनामूल्य पैसे काढता येतात. यामध्ये मेट्रो एटीएमसह कोणत्याही एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा समाविष्ट आहे.
- 2 लाख रुपयांच्या अंगभूत अपघात विमा संरक्षणासह मोफत रुपे डेबिट कार्ड.

> *पीएम जन धन योजना यशस्वी करण्यासाठी ज्यांनी अथक परिश्रम घेतले, त्या सर्वांच्या प्रयत्नांचे मी कौतुक करतो. त्यांच्या प्रयत्नांमुळे भारतीयांचे जीवनमान उंचावले आहे.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

देशात 50 कोटींहून अधिक गरीब लोक असे होते ज्यांचे बँक खातेही नव्हते. या वर्गाने कधी बँकेच्या दारापर्यंत जाण्याचे धाडस केले नव्हते. त्याच्यासाठी बँक खाते असणे हीदेखील केवळ श्रीमंतांचीच गोष्ट होती. मात्र, ऑगस्ट 2014 नंतर जेव्हा त्याने पाहिले की बँक स्वतः त्याच्या दारापर्यंत येत आहेत, तेव्हा त्याच्यामध्ये आत्मविश्वास आणि स्वाभिमान जागृत झाला आणि त्याच्या मनात एका नव्या आशेचे बीज रुजले. आज तो मोठ्या अभिमानाने आपल्या खिशातून रुपे कार्ड बाहेर काढतो. एक काळ असा होता की, रुपे कार्ड (डेबिट कार्ड) असणे हे केवळ श्रीमंतांसाठीच प्रतिष्ठेचे प्रतीक मानले जात होते. मात्र, केंद्र सरकारने जन-धन खात्यांच्या माध्यमातून ही मानसिकता बदलून टाकली. जन-धनच्या रूपाने रुजवलेले हे बीज आज वटवृक्ष बनले असून, त्याने अशा असंख्य परिवर्तनांची फळे दिली आहेत.

जन-धनचा पाया

पंचस्तरीय प्रभावाचा आधार बनला

आज जन धन योजनेअंतर्गत 58 कोटींहून अधिक बँक खाती आहेत. या योजनेने केवळ सार्वत्रिक बँकिंग सुविधाच सुनिश्चित केली नाही, तर सर्वसमावेशक विकासाचा पायाही घातला आहे. याचा मुख्य परिणाम म्हणजे देशातील जवळपास सर्व कुटुंबे आणि नागरिक आता बँकिंग व्यवस्थेचाभाग बनले आहेत. हे केवळ एक बँक खाते नसून, नियोजनबद्ध पद्धतीने उभारलेले एक व्यापक आर्थिक सुरक्षा-कवच बनले आहे.

10 जन धन योजनेची मुखपृष्ठ कथा 12 वर्षे

1 परिणाम लोककेंद्रित आर्थिक उपक्रमांचा पाया

1 देशातील प्रत्येक कुटुंबाला किमान एक मूलभूत बचत बँक खाते उपलब्ध करून देऊन बँक सुविधा असलेल्या भारताचा पाया घातला गेला.

89%+ पेक्षा अधिक प्रौढ नागरिकांकडे आज भारतात बँक खाते आहे, असे जागतिक बँकेच्या ग्लोबल फिनडेक्स 2025 च्या अहवालानुसार दिसून येते.

35% प्रौढ नागरिकांकडे 2011 मध्ये देशातील केवळ बँक खाते होते.

2 शून्य शिल्लक रकमेवर (झिरो बॅलन्स) खाते उघडण्याची सुविधा, ज्यामुळे गरीबातील गरीब नागरिकालाही औपचारिक बँकिंग व्यवस्थेशी जोडले जाणे शक्य झाले.

आता शून्य शिल्लक असलेल्या खात्यांची संख्या **10%** पेक्षाही कमी राहिली आहे.

3 डेबिट कार्ड आता केवळ स्टेटस सिम्बॉल राहिलेले नाही; ऑनलाइन व्यवहारांमध्येही वाढ झाली आहे.

40.89 कोटी रुपे डेबिट कार्डे खातेदारांना विनामूल्य जारी करण्यात आली, ज्यामुळे डिजिटल पेमेंटची सवय जनसामान्यांपर्यंत पोहोचण्यास मोठी मदत झाली.

4 अपघात विमा संरक्षण आणि ओव्हरड्राफ्ट सुविधेमुळे खातेदारांना अतिरिक्त आर्थिक सुरक्षा मिळाली.

34.77 लाख प्रधानमंत्री जन-धन योजना (**PMJDY**) खातेदारांनी ओव्हरड्राफ्ट सुविधेचा लाभ घेतला आहे. या अंतर्गत अटी आणि शर्तींच्या अधीन 10 हजार रुपयांपर्यंत ओव्हरड्राफ्टची सुविधा उपलब्ध आहे.

> *ज्यावेळी अखेरच्या टप्प्यावर असलेली व्यक्तीही आर्थिकदृष्ट्या जोडली जाते, त्यावेळी संपूर्ण देश एकत्रितपणे पुढे जातो. प्रधानमंत्री जन धन योजनेने हेच यश साध्य केले आहे. यामुळे लोकांच्या सन्मानात भर पडली आहे आणि त्यांना स्वतःचे भाग्य स्वतः लिहिण्याची ताकद लाभली आहे.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

यामुळे घडून आलेला दुसरा परिणाम म्हणजे जन-धन-आधार-मोबाईल (जॅम त्रिसूत्री) च्या त्रिशक्तीने सरकारी योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित होईल याची सुनिश्चिती झाली आहे. यामुळे भ्रष्टाचार आणि गळतीला आळा बसला. मध्यस्थांची भूमिका संपुष्टात आली आणि सामाजिक-आर्थिक बांधीलकीशी जोडलेल्या योजनांचा थेट लाभ अखेरच्या टप्प्यावरच्या व्यक्तीलाही मिळू लागला. यामुळे अर्थव्यवस्थेला एक औपचारिक स्वरूप आले आणि रोख व्यवहारांना बँकिंग व्यवस्थेत आणता आले. आज जन-धन योजनेमुळे लाभाच्या योजनांची रक्कम थेट बँक खात्यांमध्ये हस्तांतरित होणे, पक्की घरे देणे, उज्ज्वला योजने अंतर्गत मोफत गॅस सिलेंडर, मुद्रा योजनेअंतर्गत विनातारण कर्जाची सुविधा, पीएम स्वामित्व असो वा अन्य सामाजिक बांधीलकीशी जोडलेल्या योजना असोत, या सगळ्यातून गरीबांचा आत्मविश्वास वाढला आहे.

यामुळे घडून आलेला तिसरा परिणाम म्हणजे सामान्य नागरिकांची सामाजिक सुरक्षा सुनिश्चित झाली आणि सर्वसमावेशक विकासाच्या एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. जन-धन खात्यामुळेच प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि



5

बँकिंग मित्र आणि बँकिंग व्यवस्थेच्या विस्तारामुळे तळागाळातील अखेरच्या घटकापर्यंत बँकिंग सेवा पोहोचल्या आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये बँकिंग सुविधेची उपलब्धता सुनिश्चित झाली आहे.

13.55 लाख

बँकिंग मित्र (व्यवसाय प्रतिनिधी) शाखारहित सेवा पुरवत आहेत.

45.68 कोटी

खाती ग्रामीण आणि निम शहरी भागांत उघडली गेली आहेत, या खात्यांचे एकूण खात्यांमधील प्रमाण जवळपास 78% इतके आहे.

6

बचत संस्कृती आणि आर्थिक शिस्तीची सुनिश्चिती झाली आहे.

किमान शिल्लक रक्कम ठेवण्याची सक्ती नसतानाही जन-धन खात्यांमध्ये

3.10 लाख कोटी रुपये

इतकी रक्कम जमा आहे.

जन धन योजनेची मुखपृष्ठ कथा 10 वर्षे

2 परिणाम
प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण (डीबीटी) आणि प्रशासनातील पारदर्शकता

1

जन-धन-आधार-मोबाईल (जॅम त्रिसूत्री) च्या त्रिशक्तीने सरकारी योजनांचे अनुदान आणि लाभ थेट लाभार्थ्यांच्या खात्यांत हस्तांतरित करणे शक्य झाले.

52.50 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त

अनुदान जन-धन, आधार आणि मोबाईल (त्रिशक्ती) या त्रिसूत्रीचा वापर करून थेट नागरिकांना हस्तांतरित केले गेले आहे.

900+

योजनांच्या लाभार्थ्यांना लाभाची रक्कम डीबीटीद्वारे हस्तांतरित केली जाते.

2

मध्यस्थांची भूमिका संपुष्टात आली, यामुळे भ्रष्टाचार आणि गळतीमध्ये लक्षणीय घट झाली आहे.

डीबीटीमुळे सामाजिक सुरक्षेअंतर्गतच्या लाभार्थ्यांची व्याप्ती वाढली आहे.

3

सरकारी तिजोरीची कोट्यवधी रुपयांची बचत झाली असून, आता रक्कम थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचू लागली आहे.

- डीबीटीमुळे सरकारची **₹5+** लाख कोटींची बचत झाली आहे. दुहेरी, बनावट गॅस जोडण्या आणि शिधापत्रिका वगळल्या गेल्याने बनावटपणासारखी प्रकरणे संपुष्टात आली आहेत.
- डीबीटीमुळे अनुदान वाटपाचे प्रमाण एकूण सरकारी खर्चाच्या 16 टक्क्यांवरून घटून 9 टक्क्यांवर आले आहे, ही प्रगती म्हणजे सार्वजनिक खर्चाच्या कार्यक्षमतेत घडून आलेली एक मोठी सुधारणा आहे.

4

पात्र नागरिकांपर्यंत पीएम किसान सन्मान निधी, उज्ज्वला योजना, कोविड मदत निधी यांसारख्या योजनांचा लाभ, थेट आणि वेळेवर पोहोचला आहे.

₹4.46 लाख कोटींपेक्षा जास्त

रक्कम शेतकऱ्यांना 23 हप्त्यांमध्ये वितरित केली गेली आहे.

9.44 कोटींपेक्षा जास्त

शेतकऱ्यांना मदत मिळाली असून त्यात 23% महिला लाभार्थी आहेत.

- पीएम किसान योजनेचा 2,000 रुपयांचा पहिला हप्ता एप्रिल, 2020 मध्ये दिला गेला, 8.7 कोटी शेतकऱ्यांना लाभ मिळाला.
- उज्ज्वला योजनेअंतर्गत सुमारे 11 कोटी एलपीजी जोडण्या दिल्या गेल्या आहेत, अनुदानही थेट खात्यात जमा होऊ लागले आहे.
- 3 कोटी विधवा आणि दिव्यांग व्यक्तींना कोविड-19 साथरोगाच्या काळात प्रति लाभार्थी 1,000 रुपये इतकी मदत दिली गेली.

5

जादा व्याजदर आकारणाऱ्या स्थानिक सावकारांवरील अवलंबित्व कमी झाले असून कर्जाचे दुष्टचक्र मोडून काढण्यात मदत मिळाली आहे.

- प्रधानमंत्री जनधन योजनेच्या माध्यमातून गरीब आणि वंचित घटक बँकिंग व्यवस्थेशी जोडले गेले, खाते उघडले गेल्यामुळे ओव्हरड्राफ्टची सुविधा आणि कर्ज मिळू लागले.
- सुमारे 84 लाख पथविक्रेत्यांना पीएम स्वनिधी योजनेअंतर्गत मार्च, 2026 पर्यंत 17,000+ कोटी रुपयांचे विनातारण कर्ज मिळाले.

6

अर्थव्यवस्थेचे औपचारिकीकरण

- रोखीवर आधारित अनौपचारिक व्यवहार बँकिंग व्यवस्थेच्या कक्षेत आणले गेले.
- शून्य शिल्लकीची जन-धन खाती उघडल्याने खाते नसलेले लोक पैसे घरात ठेवण्याऐवजी बँकांमध्ये जमा करू लागले.
- रोख व्यवहारांमध्ये सावकार गैरफायदा घ्यायचे, मात्र आता ऑनलाईन पेमेंटमुळे नोंदी ठेवणे सोपे झाले.

7

आर्थिक व्यवहारांचा माग राखला जात असल्याने गरीब नागरिकांचे पत मानांकन आणि भविष्यात कर्जासाठी पात्र ठरण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरू लागले आहे.

- गरीब आणि अनौपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्यांचे पतमानांकन मजबूत नसायचे, त्यामुळे बँका त्यांना कर्ज देत नव्हत्या, मात्र आता जन धन योजनेमुळे मार्ग सुलभ झाला आहे.
- कर्ज सुविधेचा विस्तार झाल्याने गरीब-वंचित घटकांच्या राहणीमानात सुधारणा घडून आली आहे, शैक्षणिक कर्ज घेऊन मुलांचे शिक्षण करून लागले आहे.

जन-धन योजना आर्थिक समावेशनाचा विस्तार करण्यासाठी आणि कोट्यवधी नागरिकांना, विशेषतः महिला, युवा आणि वंचित घटकांमधील समुदायांना सन्मान मिळवून देण्यात आघाडीवर राहिली आहे.

-नरेंद्र मोदी, पंतप्रधान

अटल पेन्शन योजनेसारख्या सामाजिक सुरक्षा योजनांशी लोक जोडले गेले आहेत.

ज्यावेळी प्रधानमंत्री जन-धन योजना सुरू केली गेली, त्यावेळी काय होणार, कसे होणार? असे अनेक लोकांना वाटत होते. मात्र याअंतर्गत गरिबांसाठीच्या एकामागून एक योजना जोडल्या गेल्या. हा आर्थिक - सामाजिक सक्षमीकरणाचा पाया होता, आणि त्याच्या विस्ताराची व्याप्ती आणखी वाढवली जात होती. या देशात काही लोकांना सरकारी निवृत्तीवेतन मिळते. सुमारे 35 लाख लोकांना पूर्वी किती निवृत्तीवेतन मिळत होते? कोणाला सात रुपये, कोणाला 20 रुपये, कोणाला सव्वाशे रुपये, तर कोणाला अडीचशे रुपये. त्यातही निवृत्तीवेतन घेण्यासाठी मैलोनमैल प्रवास करावा लागत होता. मात्र आता डीबीटीमुळे हे काम सोपे झाले आहे. असंघटित क्षेत्रातील कोट्यवधी कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबांना पहिल्यांदाच जीवन आणि अपघात विम्याचे संरक्षण मिळाले आहे. इतकेच नाही, तर मुद्रा योजना असो वा अन्य योजना, या बँक

3 परिणाम सामाजिक सुरक्षा आणि समावेशक विकास

1

जन-धन खात्यांच्या माध्यमातून प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि अटल पेन्शन योजना यांसारख्या सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ खातेदारांना उपलब्ध करून देण्यात आला.

27.8+ कोटींहून

अधिक नागरिक प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेत सहभागी

- कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास 2 लाख रुपयांचे जीवन विमा संरक्षण उपलब्ध.
- वार्षिक हप्ता केवळ 436 रुपये आहे. म्हणजेच, दररोज 1.20 रुपयांपेक्षाही कमी खर्चात विमा संरक्षण मिळते.

58.78 कोटी

नागरिकांची **प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेत** नोंदणी

- मृत्यू किंवा कायमस्वरूपी पूर्ण दिव्यांगत्व आल्यास 2 लाख रुपये, तर कायमस्वरूपी अंशतः अपंगत्व आल्यास 9 लाख रुपयांचे एक वर्षासाठी अपघाती विमा संरक्षण उपलब्ध आहे.
- वार्षिक 20 रुपयांचा हप्ता (सुमारे एका कप चहाच्या खर्चाइतका) असलेली ही योजना 18 ते 70 वर्षे वयोगटातील व्यक्तींसाठी आहे.

9.29 कोटी

ग्राहकांची **अटल पेन्शन योजनेत** नोंदणी

- ही सरकारकडून निवृत्तीवेतनाची हमी देणारी पहिली योजना आहे. या योजनेअंतर्गत दरमहा 1,000 ते 5,000 रुपयांपर्यंतच्या निवृत्तीवेतनाची हमी दिली जाते.
- वय आणि निवडलेल्या निवृत्तीवेतनाच्या रकमेच्या आधारावर सध्या दरमहा 42 ते 1,454 रुपयांपर्यंतचा हप्ता भरावा लागतो.

2

मुद्रा योजनेअंतर्गत कर्ज सुविधेमुळे लहान उद्योजक, विशेषतः महिला आणि ग्रामीण भागातील नागरिकांसाठी स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या.

59+

कोटींहून अधिक कर्जे प्रधानमंत्री मुद्रा योजने अंतर्गत वितरित करण्यात आली.

40.76

लाख कोटी रुपयांची कर्जरक्कम उद्योजकांना वितरित करण्यात आली.

3 **बचतीची सवय लागल्यामुळे आर्थिक शिस्त आणि भविष्यासाठी नियोजन करण्याची क्षमता वाढली.**

सुमारे 3.10 लाख कोटी रुपये, 58.70 कोटी जन-धन खात्यांमध्ये जमा आहेत. या खात्यांमध्ये किमान शिल्लक ठेवणे बंधनकारक नाही.

4 **असंघटित क्षेत्रातील कोट्यवधी कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना प्रथमच जीवन आणि अपघात विम्याचे संरक्षण मिळाले.**

- असंघटित क्षेत्रातील कामगारांनी ई-श्रम पोर्टलवर **31.65** कोटींहून अधिक नोंदणी केली आहे. या एकाच पोर्टलच्या माध्यमातून विविध सामाजिक-आर्थिक योजनांचा लाभ मिळतो.

- पीएमजेडीवाय खातेदारांना प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि अटल पेन्शन योजना यांसारख्या सामाजिक सुरक्षा योजनांमध्ये नोंदणी करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. तसेच, या योजनांचे हप्ते जन-धन खात्यातून भरण्याची सुविधाही उपलब्ध आहे.



> *जन-धन योजनेमुळे आर्थिक समावेशन आणि सन्मानजनक जीवनासह असंख्य भारतीयांचे सक्षमीकरण सुनिश्चित झाले आहे. यामुळे पारदर्शकता वाढण्यासही मदत झाली आहे.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

खात्यामुळे स्वयंरोजगाराचे नवे मार्ग खुले झाले आहेत. मुद्रा योजना किंवा अन्य योजना, या बँक खात्याच्या माध्यमातून स्वयंरोजगाराच्या नव्या संधी खुल्या झाल्या आहेत.

चौथा परिणाम असा झाला की, देशाची निम्मी लोकसंख्या असलेल्या नारीशक्तीचे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण झाले. महिलांना प्रथमच सामाजिक आणि आर्थिक प्रतिष्ठा मिळाली. आज जन-धन खात्यांमध्ये महिलांचा वाटा 56 टक्क्यांहून अधिक आहे. महिलांच्या नावावर बँक खाती असल्यामुळे कुटुंबाच्या आर्थिक निर्णयांमध्ये त्यांना सहभाग आणि स्वावलंबनाची संधी मिळाली आहे. बचतीची सवय आणि प्रवृत्ती यांना बँकिंग

जन धन योजनेची मुखपृष्ठ कथा 10 वर्षे

4 परिणाम महिला सक्षमीकरण आणि सामाजिक सन्मान

1. जन-धन खात्यांमध्ये महिलांचा वाटा सुमारे 56 टक्के आहे. महिला आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

2. स्वतःच्या नावावर बँक खाते असल्यामुळे महिलांना कुटुंबातील आर्थिक निर्णयांमध्ये सहभाग घेण्याची आणि स्वावलंबी होण्याची संधी मिळाली.

32.72 कोटी

महिलांची जन-धन खाती उघडण्यात आली आहेत. आता महिला आपली बचत, बँक खात्यात सुरक्षित ठेवू शकतात.

75%

घरे महिलांच्या नावावर किंवा संयुक्त मालकीच्या स्वरूपात मंजूर करण्यात आली आहेत. यासोबतच, इतर अनेक योजनांमध्येही महिलांना प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे त्यांच्या बँक खात्यांमध्ये थेट मदत किंवा अनुदानाची रक्कम जमा होत आहे.

3. थेट लाभ हस्तांतरणाच्या योजनांमुळे महिलांना मदतीची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात मिळणे शक्य झाले आहे. यामुळे त्यांची सामाजिक प्रतिष्ठाही वाढली आहे.

महिला लाभार्थी

68% प्रधानमंत्री मुद्रा योजनेतील महिला लाभार्थी

44% प्रधानमंत्री स्वनिधी योजनेतील महिला लाभार्थी

10+ कोटींहून

अधिक ग्रामीण कुटुंबातील महिला, स्वयं-सहायता गटांमध्ये सहभागी आहेत. या गटांना सरकारकडून मदतही दिली जाते.

सुकन्या समृद्धी योजनेच्या खात्यांमध्ये जमा होणाऱ्या बचतीमुळेही मिळाली महिला सक्षमीकरणाला चालना.

> *जन-धन योजना ही आपल्या नागरिकांना सबळ करण्याच्या दिशेने एक मैलाचा दगड ठरली आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विकसित होत असलेल्या अर्थव्यवस्थेत प्रत्येक भारतीयाला योग्य स्थान मिळावे, यासाठी लाखो लोकांना आर्थिक मुख्य प्रवाहात आणण्यात आले आहे.*
>
> **–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

4

कोविड-19 महासाथीच्या काळात महिला खातेदारांना तातडीची अनुदानात्मक मदत थेट त्यांच्या बँक खात्यांमध्ये हस्तांतरित करणे शक्य झाले.

30,600 कोटी रुपयांची

एकूण मदत कोविड-19 च्या काळात 20.40 कोटी पीएमजेडीवाय महिला खातेदारांना दरमहा 500 रुपये, अशा सलग तीन हप्त्यांमध्ये देण्यात आली.

14.17+ कोटींहून

अधिक एलपीजी सिलिंडर कोविड-19 च्या काळात सुमारे 8 कोटी प्रधानमंत्री उज्ज्वला योजना लाभार्थींना उपलब्ध करून देण्यात आली. त्यासाठी 9,670 कोटी रुपयांचे अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यांमध्ये थेट लाभ हस्तांतरणाद्वारे जमा करण्यात आली.

5

पूर, दुष्काळ यांसारख्या अन्य नैसर्गिक आपत्तींच्या काळातही आपत्कालीन स्वरूपाची आर्थिक मदत थेट हस्तांतरित करण्यासाठी जन-धन खाती एक प्रभावी माध्यम ठरली.

व्यवस्थेमुळे चालना मिळाली आहे. बँकांच्या माध्यमातून बचत करण्यामुळे नागरिकांमध्ये आर्थिक सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. इतकेच नव्हे, तर कोविड-19 महासाथीच्या काळात केंद्र सरकारने महिलांच्या खात्यांमध्ये पाठवलेली मदतही जन-धन खात्यांमुळेच शक्य झाली. जन-धन खाती नसती, तर कोविडच्या काळात ही मदत थेट खात्यांमध्ये पोहोचवणे किती कठीण झाले असते, याचा सहज अंदाज येऊ शकतो. त्यामुळे कोणत्याही आपत्ती किंवा संकटाच्या काळात नागरिकांपर्यंत आर्थिक मदत पोहोचवण्यासाठी जन-धन खाती महत्त्वाचा आधार ठरली आहेत.

पाचवा आणि महत्त्वाचा परिणाम म्हणजे सुदूर ग्रामीण भागातील नागरिकही तंत्रज्ञानाच्या दृष्टीने अधिक सक्षम झाले आहेत. या बँक खात्यांमुळे डिजिटल आणि यूपीआय आधारित व्यवहारांना मोठी चालना मिळाली. रुपे कार्ड आणि मोबाइल बँकिंगच्या माध्यमातून ग्रामीण भागातही डिजिटल साक्षरता वाढली आहे. भारताचा यूपीआय आज जागतिक स्तरावर ओळखला जाणारा डिजिटल अर्थव्यवहारांचा मंच बनला आहे.



जन धन योजनेची मुखपृष्ठ कथा 10 वर्षे

5 प्रभाव डिजिटल भारत आणि तंत्रज्ञान सक्षमीकरण

1 **जन-धन खात्यांनी युपीआय सारख्या डिजिटल व्यवहार क्रांतीचा पाया रचला आहे. ज्यामुळे भारत आज जगातला सर्वाधिक डिजिटल व्यवहार करणारा देश बनला आहे.**

55.49 कोटी
युपीआय वापरकर्ते आहेत.

314+ लाख कोटी रुपयांचे
व्यवहार युपीआय द्वारे वर्ष 2025-26 मध्ये झाले आहेत.

10
देश (भूतान, सिंगापूर, युएई, फ्रांस, मॉरिशस, श्रीलंका, नेपाळ, कतार, ग्रीस, कंबोडिया) युपीआयचा वापर करत आहेत.

2 **रुपे कार्ड आणि मोबाइल बँकिंगमुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील क्षेत्रातही, डिजिटल साक्षरतेचा प्रसार झाला आहे.**

40.89 कोटी
RuPay
रुपे डेबिट कार्ड जन-धन खाते धारकांना जारी करण्यात आले आहेत.

6.39 कोटी
लोकांना प्रधानमंत्री ग्रामीण डिजिटल साक्षरता अभियानाअंतर्गत प्रशिक्षित करण्यात आले आहे.

3 **जन-धन दर्शक ॲप अनुसार मॅपिंग करण्यात आलेल्या पाच किमी'च्या आतील परिसरात बँकिंग आऊटलेट सेवा सुरू करण्यात आल्या आहेत.**

21.6 लाखांपेक्षा अधिक बँकिंग टचपॉईंट्स देशात आहेत.

6 लाखांपेक्षा अधिक म्हणजे 99.92% गावांपर्यंत, 5 किमीच्या क्षेत्रात बँकिंग सुविधा पोहोचल्या आहेत (बँक शाखा, इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक किंवा बँक मित्र)

राष्ट्रीय आणि जागतिक ओळख

1

जागतिक बँक तसेच गिनीज वर्ल्ड रेकॉर्डस'ने या योजनेला वित्तीय समावेशनाचे जगातील सर्वात मोठे अभियान म्हणून मान्यता दिली आहे.

18,096,130

खाती 23 ते 29 ऑगस्ट 2014 च्या अभियानाच्या एका आठवड्यात, जन-धन योजनेअंतर्गत उघडली गेली होती. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसनेही त्यांची नोंद केली आहे .

2

ही योजना, इतर विकसनशील देशांसाठी सर्वसमावेशक वित्तीय मॉडेलचे आदर्श उदाहरण म्हणून ओळखली गेली.

प्रधानमंत्री जन-धन योजना एक गेमचेंजर ठरली आहे. गरीबी निर्मूलनाच्या अनेक योजनांचा आधार म्हणून तिचा उपयोग होत असून त्याचा लाभ कोट्यवधी लोकांना मिळतो आहे. जन-धन योजनेमुळेच अनेक कुटुंबांचे भविष्य सुरक्षित झाले आहे. या योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये मोठी संख्या ग्रामीण क्षेत्रातील लोक आणि महिलांची आहे.

-नरेंद्र मोदी, पंतप्रधान

जन-धन योजना बहुस्तरीय प्रभावाचा एक महत्वाचा आधार ठरली आहे. याच कारणामुळे आंतरराष्ट्रीय नाणे निधी असो किंवा इतर जागतिक संस्था, सर्वांनी या योजनेची प्रशंसा केली आहे. आणि म्हटले आहे की जन-धन ने बँक खाती आणि वित्तीय सेवा लोकांपर्यंत व्यापकपणे पोहोचवल्या आहेत. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये सुद्धा या योजनेला विशेष स्थान मिळाले आहे. जगातील सर्वात मोठ्या वित्तीय समावेशनाच्या उपक्रमाचा आधार ठरलेली ही जन-धन योजना, आज अनेक विकसनशील देशांसाठी एक आदर्श उदाहरण ठरली आहे.

एक लोकचळवळ जी ठरली जीवनरेखा

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या 12 वर्षांच्या या प्रवासात, जन-धन योजना केवळ एक आर्थिक योजना नाही, तर सामाजिक न्याय, पारदर्शक शासन आणि सर्वसमावेशक विकासाचे प्रतीक ठरली आहे. बँकिंग-विरहित भारतापासून ते बँकिंग-युक्त भारताचा हा प्रवास, कोट्यवधी नागरिकांसाठी सन्मान, सुरक्षितता आणि आत्मनिर्भरतेचा मार्ग ठरला आहे. खऱ्या अर्थाने जन-धन योजनेचे यश आणि तिचा बहु आयामी प्रभाव, यामुळेच सुशासनातून स्वावलंबन, हा नव्या भारताचा संस्कार बनून, विकसित भारताचा मार्ग प्रशस्त करत आहे. ■

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम बघण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा.

जिंदहून सुमारे 14,700 कोटी रूपये खर्चाच्या विकास प्रकल्पांची भेट

रेल्वे वाहतुकीचे भवितव्य...

हायड्रोजन ट्रेन

भारताने पर्यावरण अनुकूल वाहतुकीच्या दिशेने अभूतपूर्व प्रगती केली आहे. 1155 किलोमीटर्ससह जगातील तिसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे मेट्रो जाळे असो, किंवा 23 हजार इलेक्ट्रिक बस वाहतुकीत आणण्याची मंजूरी असो, किंवा मग ग्रीनफील्ड द्रुतगती मार्गांचे वाढते जाळे असो, सगळीकडे हरित पायाभूत सुविधा निर्माण केल्या जात आहेत. याच मालिकेत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 17 जुलै रोजी, हरियाणा इथे जिंद आणि सोनिपत दरम्यान, भारताच्या पहिल्या स्वदेशी हायड्रोजन ट्रेन ला हिरवा झेंडा दाखवला. ही केवळ एक रेल्वेगाडी नाही तर आत्मनिर्भर भारत, हरित ऊर्जा आणि आधुनिक रेल्वेची नवी ओळख आहे..

रेल्वे असो, किंवा रस्ता असो, दळणवळणाचे कोणतेही काम एकीकडे सुविधा देत असते, तर दुसरीकडे विकासाच्या गतीलाही कित्येक पटीने वाढवत असते. हेच कारण आहे की सरकार वाहतूक आणि दळणवळण या क्षेत्रात सातत्याने काम करत आहे. हरियाणाच्या जिंद इथे देशातील पहिल्या हायड्रोजन ट्रेनला हिरवा झेंडा दाखवणे आणि इतर अनेक विकास प्रकल्पांच्या उद्घाटन प्रसंगी, पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की ही हायड्रोजन ट्रेन, इतर गाड्यांपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. त्यासाठी जिंद मध्ये संपूर्ण प्रणाली आणि पायाभूत सुविधा विकसित करण्यात आल्या आहेत. येत्या काळात, हायड्रोजन ट्रेनशी संबंधित इतरही पायाभूत सुविधा विकसित होतील, नवनवे कारखाने उभारले जातील जे हायड्रोजन ट्रेन नेटवर्क

> *भारताची हायड्रोजन ट्रेन प्रदूषणरहित तर आहेच, त्याशिवाय, मेक इन इंडियाचे देखील अत्यंत यशस्वी उदाहरण आहे. या हायड्रोजन ट्रेनची संरचना भारतातील अभियंत्यांनीच केली आहे, भारतीय कंपनीनेच त्याचे उत्पादन केले आहे.*
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

सर्वात शक्तिशाली हायड्रोजन ट्रेन

3,200

अश्वशक्तीची ही जगातील सर्वात लांब आणि सर्वात शक्तिशाली हायड्रोजन ट्रेन आहे.



- जगात हायड्रोजन ट्रेन सुमारे 7 ते 8 वर्षे आधी अस्तित्वात आली. आता जगातील 3 ते 4 देशांकडेच हायड्रोजन ट्रेन चालवण्याचे सामर्थ्य आहे.

एकविसाव्या शतकातील रेल्वेची ओळख

- 19 व्या शतकातील रेल्वेची ओळख वाफेच्या इंजिनामुळे होती. विसाव्या शतकातील रेल्वेची ओळख डिझेल आणि विजेवर चालणाऱ्या गाड्या अशी होती, आणि आता एकविसाव्या शतकातील रेल्वे हायड्रोजन वर चालणारी आहे.

रेल्वे जाळ्याचे विद्युतीकरण

- 1925 पासून ते वर्ष 2014 पर्यंत म्हणजे सुमारे 90 वर्षे, संपूर्ण देशातील रेल्वेजाळ्यापैकी केवळ 30 टक्के रेल्वेचे विद्युतीकरण झाले होते. मात्र गेल्या 12 वर्षांमध्ये भारताच्या सुमारे 99 % रेल्वेमार्गाचे विद्युतीकरण झाले आहे.

पाच राष्ट्रीय महामार्गांशी जोडलेले आहे जिंद

- आता जिंद देशातील असा जिल्हा बनला आहे, जो पाच राष्ट्रीय महामार्गांशी जोडलेला आहे. अशा दळणवळण व्यवस्थेमुळे इथले शेतकरी आणि पशुपालकांना आपली उत्पादने मोठमोठ्या बाजारपेठेत पाठवणे सोपे आणि स्वस्त पडेल. उद्योगांना पाठबळ मिळेल. पर्यटनाला चालना मिळेल, ज्यामुळे मोठ्या संख्येने रोजगारही वाढतील.

पंतप्रधान मोदी यांनी हरियाणाला दिली विकासाची भेट

- जिंद आणि सोनिपत दरम्यान चालणारी देशातील पहिली हायड्रोजन-चलित ट्रेन हिरवा झेंडा दाखवून केली रवाना.
- हरियाणा मध्ये 12,470 कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पाची केली पायाभरणी.
- सुमारे 9680 कोटी रुपयांच्या खर्चाने विकसित 157.92 किमी लांबीच्या चार पदरी मार्गाच्या आणि संपूर्ण सुलभ दिल्ली-अमृतसर-कटरा द्रुतगती मार्ग राष्ट्राला समर्पित.
- राष्ट्रीय महामार्ग-7 आणि राष्ट्रीय महामार्ग 344 वर बनलेल्या 33.81 किलोमीटर लांब चारपदरी, अंशतः प्रवेश नियंत्रित असलेल्या अंबाला- कालाअंब महामार्गाचे उद्घाटन.
- राष्ट्रीय महामार्ग 352 वर असलेल्या 40.60 किलोमीटर लांबीच्या जिंद-गोहाना महामार्गाचे उद्घाटन.
- हांसी-बरवाला ब्राऊनफील्ड महामार्ग प्रकल्पाची पायाभरणी. कुरुक्षेत्र इथे उन्नत रेल्वे मार्गाचे लोकार्पण.
- पंडित नेकी राम शर्मा सरकारी वैद्यकीय महाविद्यालय, भिवनी, महर्षी च्यवन मेडिकल कॉलेज आणि राव तुला रुग्णालय, कोरियावास, नार नौल सह प्रमुख चिकित्सा संस्थांचे राष्ट्रार्पण.
- या प्रदेशाची सांस्कृतिक पायाभूत चौकट अधिक मजबूत करत, कुरुक्षेत्र इथे शीख संग्रहालयाची पायाभरणी.

च्या गरजा पूर्ण करू शकतील. म्हणजे या ट्रेनमुळे, हरियाणाच्या तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणे निश्चित आहे.

मुंबई आणि ठाण्यादरम्यान धावलेल्या पहिल्या ऐतिहासिक ट्रेन प्रवासाशी तुलना करत पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की भविष्यातील पिढ्यांच्या उन्नत हरित वाहतुकीची जेव्हा चर्चा होईल, त्यावेळी हायड्रोजन ट्रेन सोबत जिंद शहराचे नावही इतिहासाच्या पानांवर लिहिले जाईल. जिंद अनेक महामार्गांशी जोडले गेले आहे, इथूनही तीन मोठे प्रकल्प सुरू होत आहेत. दिल्ली-अमृतसर-कटरा द्रुतगती मार्गावरील हरियाणाच्या भागाचे लोकार्पण केले आहे. त्याशिवाय, अंबाला-कालाअंब चौपदरी मार्गामुळे, हरियाणा आणि हिमाचल प्रदेश, या दोन्ही राज्यांतील लोकांना खूप चांगली सुविधा मिळेल. ■

पंतप्रधानांच्या हस्ते चंडीगढमधल्या विकास प्रकल्पांच्या शुभारंभाचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि आरोग्य सेवा
विकसित भारताचा मजबूत पाया

चंडीगढ केवळ एक शहर नसून भारताच्या विकासाचे एक प्रारूप राहिले आहे. विकासाला नवे पंख देण्याच्या याच शृंखलेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 17 जुलै रोजी चंडीगढमध्ये आरोग्य सेवा, शिक्षण आणि रस्ते पायाभूत सुविधेसह 4,700 कोटी रुपयांहून अधिक विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी केली आणि राष्ट्रार्पण केले. त्याचबरोबर पंजाबमधल्या जालंधरलाही त्यांनी भेट दिली...

चंडीगढ एक असे शहर आहे, जिथे शिक्षण, अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र आणि संशोधनाशी संबंधित मोठमोठ्या संस्था एकाचवेळी कार्यरत आहेत. खूप कमी शहरांमध्ये अशी क्षमता असते. येणाऱ्या काळात याच संस्था नवे तंत्रज्ञान, आरोग्य सेवा, स्टार्टअप आणि नवोन्मेषाची मोठी केंद्रे बनू शकतात. चंडीगढमध्ये विविध विकासप्रकल्पांचे उदघाटन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, विकसित भारतासाठीच्या यात्रेत आधुनिक दृष्टिकोनासह भविष्यातील तंत्रज्ञान, वाहतूक आणि आरोग्य सेवांचा विकास आवश्यक असल्याचे सांगितले. आपल्याला असे निर्णय घ्यायचे आहेत, ज्यांचा लाभ वर्तमान पिढीला तर मिळेलच, शिवाय येणाऱ्या पिढ्यांनाही मिळत राहील. आपल्याला अशा संस्था निर्माण करायच्या आहेत, ज्या काळासोबत अधिक प्रभावी होतील, असे त्यांनी सांगितले.

> *आजारांवरील उपचारांसोबतच आज प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेवरही तितकाच भर दिला जात आहे. पोषण अभियान, मिशन इंद्रधनुष, योग, एचपीव्ही लसीकरण आणि यू-विन (U-WIN) प्लॅटफॉर्म यांसारख्या अनेक महत्त्वपूर्ण प्रयत्नांमुळे कोट्यवधी लोकांचे जीवन सुरक्षित होत आहे.*
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

नित्यनवीन यशोशिखरे

- 2014 नंतर देशात 15 नव्या एम्सना मंजुरी देण्यात आली आहे.
- देशात सुमारे पावणेदोन लाख आयुष्मान आरोग्य मंदिरे कार्यरत.
- देशात 90% हून अधिक संस्थात्मक प्रसूती होत आहेत.

माता मृत्युदरात घट **86%**

- देशात 48 कोटींहून अधिक टेलिमेडिसिन सल्ले देण्यात आले आहेत.
- क्षयरोग उपचार व्याप्ती 90% हून अधिक.
- जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार 10 वर्षात क्षयरोग संसर्गात 21 %घट

चंडीगढला मिळाल्या विकासभेटी

- आरोग्य सेवा, शिक्षण आणि रस्ते पायाभूत सुविधांशी संबंधित 4,700 कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी.
- पीजीआयएमईआर, चंडीगढ येथे माता आणि बालक प्रगत केंद्र आणि प्रगत न्यूरोसायन्स केंद्राचे उद्घाटन.
- पीजीआयएमईआर येथे पीएम-एबीएचआयएम अंतर्गत 150 खाटांच्या अत्याधुनिक क्रिटिकल केअर कक्षाची पायाभरणी.
- चंडीगढमधील शैक्षणिक संस्थांशी संबंधित विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी.
- अंबाला-चंडीगढ ग्रीनफील्ड महामार्ग (एनएच-205ए) च्या पीआर-7पट्ट्याची पायाभरणी.

जालंधरला मिळाल्या विकासभेटी

5,470 कोटी रुपयांहून

अधिक किमतीच्या रेल्वे आणि रस्ते पायाभूत सुविधा प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी.

- अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत जालंधर कँटसह 75 पुनर्विकसित रेल्वे स्थानकांचे उद्घाटन.
- करतोली-अंबाला आणि अमृतसर (छेहर्टा)-वाराणसी, या रेल्वे सेवांना हिरवा झेंडा.

नांगल बांध -तलवारा -मुकेरियन नव्या रेल्वेमार्ग प्रकल्पांतर्गत सुमारे

830 कोटी रुपये

खर्चातून निर्मित दौलतपूर चौक-करतोली नव्या रेल्वे मार्गाचे उदघाटन

- पंजाबमध्ये रस्ते पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी 3,070 कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचे उदघाटन आणि पायाभरणी.
- चौपदरी दिल्ली-अमृतसर-कटरा द्रुतगती मार्गाच्या 30.9 किमी लांबीच्या 'पॅकेज-6' चे उदघाटन.
- 25.2 किमी लांबीच्या सहा-पदरी 'ग्रीनफील्ड' दक्षिण लुधियाना बायपासच्या विकासासाठी पायाभरणी.

गेल्या काही वर्षात चंडीगढला आधुनिक तंत्रज्ञानाने जोडण्यासाठी स्मार्ट ट्रॅफिक, स्मार्ट पार्किंग आणि डिजिटल प्रशासनासारखे अनेक प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. अडीच हजार कोटींहून अधिक निधी या अभियानावर खर्च झाला आहे. कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की, येथे आरोग्य, शिक्षण आणि पायाभूत सुविधांशी संबंधित विकासाची अनेक कामे सुरू होत आहेत. ■

विकसित गाव
विकसित भारताचा मजबूत पाया

विकसित गाव विकसित भारताचा पाया आहेत. विकसित भारत निर्माणाची यात्रा निरंतर सुरू असून यात युवांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. याच शृंखलेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 26 जुलै रोजी विकसित व्हायब्रंट व्हिलेज कार्यक्रम 2026 मधील सहभागींशी संवाद साधला. देशातील युवा जेव्हा मुळांशी जोडला जातो तेव्हा विकसित भारताची संकल्पना अधिक व्यापक होते, असे त्यांनी सांगितले.

काही वर्षांपूर्वी 'मेरा युवा भारत-माय भारत' मंच तयार करण्यात आला. या मंचाशी देशभरातले कोट्यवधी युवा जोडले गेले आहेत. आज संपूर्ण देशात माय भारतचे युवा स्वयंसेवक अत्यंत कौतुकास्पद कार्य करत आहेत. 'विकसित भारत डायलॉग' पासून 'व्हायब्रंट व्हिलेज कार्यक्रमा'पर्यंत युवांनी आपले सामर्थ्य दर्शवले आहे. व्हायब्रंट व्हिलेज कार्यक्रम 2026 मधील सहभागींशी पंतप्रधान मोदी यांनी संवाद साधला. देशाचे युवा सीमावर्ती गावांना जितके जाणून घेतील तितके भारत समजून घेणे त्यांना सोपे होईल, भारताच्या कानाकोपऱ्याशी ते सहजपणे जोडले जातील आणि या प्रयत्नांतून नवे बळ मिळेल, असे पंतप्रधानांनी सांगितले.

> *आजचा युवा विकसित भारताची ऊर्जाही आहे आणि विकसित भारताचा सर्वात मोठा लाभार्थीही आहे. त्यामुळे युवा शक्ती जेव्हा देशाची आव्हाने आणि उपायांशी थेट जोडली जाईल, तेव्हा भविष्य नक्कीच उज्ज्वल असेल.*
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

सहभागींसोबत पंतप्रधानांचा दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद

देशभरातल्या
245
जिल्ह्यांतून 5,000 हून अधिक माय भारत स्वयंसेवक या कार्यक्रमात आभासी माध्यमाने सहभागी.

2.30
कोटींहून
अधिक युवांना माय भारत उपक्रमाचा लाभ, तर 2.86 लाख युवांचा देशव्यापी प्रश्नमंजूषेत भाग.

403 स्वयंसेवकांना सीमावर्ती गावांचा दौरा करण्यासाठी निवडण्यात आले.

देशाचे पहिले गाव, भारताची सीमावर्ती गावे

माय भारतच्या माध्यमातून राबवला जाणारा विकसित व्हायब्रंट व्हिलेज कार्यक्रम, हा भारताच्या सीमावर्ती गावांना देशाची पहिली गावे म्हणून ओळख देण्याच्या आणि विकसित भारताच्या यात्रेत त्यांना सक्रिय भागीदार करण्याच्या पंतप्रधानांच्या संकल्पनेला साकारण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

दोन टप्प्यात आयोजन

विकसित व्हायब्रंट व्हिलेज कार्यक्रम 2026चे आयोजन, दिनांक 4 जून ते 30 जून 2026 या कालावधीत दोन टप्प्यांत करण्यात आले. यामध्ये लद्दाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधील 74 व्हायब्रंट गावांचा समावेश होता. प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या 400 हून अधिक युवा सहभागींची निवड एका राष्ट्रव्यापी ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धेद्वारे करण्यात आली. या प्रश्नमंजूषेत तीन लाखांहून अधिक युवा सहभागी झाले.

कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम

विकसित व्हायब्रंट व्हिलेज कार्यक्रम 2026 अंतर्गत,सहभागींनी स्थानिक समुदायांसोबत वास्तव्य केले आणि विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला. यामध्ये स्वच्छता मोहिमा, सरकारी योजनांबाबत जनजागृती मोहीम, युवा संमेलन, सांस्कृतिक आदानप्रदान कार्यक्रम, वृक्षारोपण मोहिमा, लघू पंचायत प्रारूपाचे प्रात्यक्षिक, स्थानिक कारागिरांशी संवाद आणि धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या संस्थांना भेटी देणे यांचा समावेश होता. या कार्यक्रमामुळे सहभागींना भारताच्या सीमावर्ती भागांमधील सामाजिक-आर्थिक परिस्थिती, सांस्कृतिक वारसा आणि विकासाच्या आकांक्षा यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. तसेच, यामुळे सामुदायिक भागीदारी, राष्ट्रीय एकता आणि सीमावर्ती गावांचे रणनैतिक महत्त्व यांबाबतची समज अधिक वृद्धिंगत झाली.

सीमावर्ती क्षेत्रात पर्यटन बहरत आहे. ओस पडलेल्या गावांमध्ये पुन्हा गजबज सुरू होऊ लागली आहे. मुली शाळा -महाविद्यालयात जात आहेत. चांगले शिक्षण आणि चांगल्या कमाईसाठी पोषक वातावरण निर्माण होत आहे. व्हायब्रंट व्हिलेज कार्यक्रम सीमावर्ती गावातल्या या विकासाला आणखी गती देत आहे. कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी पुन्हा विश्वास व्यक्त केला की, भारताचे युवा 21 व्या शतकातील जगाला आकार देणार आहेत. भारताच्या युवा पिढीसाठी हे विधिलिखित आहे. ■

पीएम मोदी का पूरा कार्यक्रम देखने के लिए QR कोड स्कैन करें।

राष्ट्रीय अंतराळ दिवस 23 ऑगस्ट

भारताचे पहिले खाजगी कक्षीय प्रक्षेपण यान 'विक्रम-1' चे यशस्वी प्रक्षेपण

लाखो भारतीयांच्या कौशल्य आणि प्रतिभेच्या जोरावर जागतिक अंतराळ क्षेत्रात भारत आपली छाप पाडत आहे. केंद्र सरकारने अंतराळ क्षेत्रात केलेले महत्त्वपूर्ण बदल हे यामागील प्रमुख कारण आहे. सरकारच्या सुधारित धोरणांमुळेच युवा वर्ग, खाजगी कंपन्या आणि स्टार्टअप्सना महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध होत आहेत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे भारताच्या पहिल्या खाजगी रॉकेट 'विक्रम-1' चे यशस्वी प्रक्षेपण. झपाट्याने वाढणाऱ्या जगाच्या अंतराळ अर्थव्यवस्थेत भारत हा प्रबळ दावेदार बनत असल्याचे हे द्योतक आहे...

विक्रम-1चे यशस्वी प्रक्षेपण हे एखाद्या मोहिमेच्या यशाहून वरचढ आहे. भारतीय नवोन्मेष, धाडसी धोरणात्मक सुधारणा आणि भक्कम सार्वजनिक-खाजगी भागीदारी यांचे पाठबळ लाभलेल्या एका नव्या युगाची ही नांदी आहे. अंतराळ विभागाचे राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह म्हणाले की, या मोहिमेमुळे आंतरराष्ट्रीय अंतराळ क्षेत्रात एक भरवशाचा, विश्वसनीय आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत भागीदार म्हणून भारताचे स्थान अधिक बळकट झाले आहे.

विक्रम-1 च्या प्रक्षेपणाचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

राष्ट्रीय अंतराळ दिन हा भारतातील तरुणांसाठी उत्साह आणि प्रेरणेचा प्रसंग ठरला असून, राष्ट्रासाठी अभिमानास्पद बाब आहे.

भविष्यातील व्यावसायिक कक्षीय प्रक्षेपण सेवांसाठी भक्कम पाया

विक्रम-1 हे भारताचे पहिले खाजगीरित्या विकसित केलेले कक्षीय प्रक्षेपण यान आहे. यामध्ये 350 किलोग्रॅमपर्यंतचा पेलोड पृथ्वीच्या निम्न कक्षेत (LEO) पोहोचवण्याची क्षमता आहे. सुमारे 22 मीटर उंच असलेल्या या प्रक्षेपण यानामध्ये अनेक स्वदेशी तांत्रिक प्रगतीचा समावेश आहे. जसे की, भारताचे पहिले पूर्णपणे कार्बन-कंपोझिट कक्षीय प्रक्षेपक, त्याच्या कक्षीय समायोजन मॉड्यूलला ऊर्जा देणारे 100% 3डी-प्रिंटेड द्रव इंजिन, एक प्रगत अल्ट्रा-लो-शॉक न्यूमॅटिक सेपरेशन प्रणाली आणि देशातील सर्वात लांब मोनोलिथिक कार्बन-कंपोझिट प्रक्षेपक टप्प्यांपैकी एक. या यशस्वी मोहिमेने महत्त्वपूर्ण प्रणोदन, एव्हियोनिक्स, टेलिमेट्री, नेव्हिगेशन आणि उड्डाण-नियंत्रण प्रणालींना प्रमाणित केले, ज्यामुळे भारतातील भविष्यातील व्यावसायिक कक्षीय प्रक्षेपण सेवांसाठी एक मजबूत पाया घातला गेला आहे.



अंतराळ परिसंस्थेतील परिवर्तन

वर्ष 2020 मध्ये करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण सुधारणांमुळे, भारताच्या अंतराळ परिसंस्थेमध्ये प्रचंड परिवर्तन झाले आहे. काही वर्षांपूर्वी जिथे खाजगी प्रक्षेपण परिसंस्था अस्तित्वात नव्हती, तिथे आज भारतात 400 हून अधिक अंतराळ स्टार्टअप्स आहेत. विक्रम-1 ची निर्मिती करणारा स्कायरूट हा स्टार्टअप देशातील पहिला 'स्पेस युनिकॉर्न' देखील आहे.

$9 अब्ज डॉलर्सच्या निकट पोहोचणारी अंतराळ अर्थव्यवस्था

$44 अब्ज डॉलर्सपर्यंत वृद्धीचे आगामी दशकातील राष्ट्रीय उद्दिष्ट

विक्रम-1 चे यश हे धोरणात्मक सुधारणा कशाप्रकारे नवोन्मेषाला गती देऊ शकतात याचे द्योतक होय. ■

विक्रम-1 च्या यशस्वी प्रक्षेपणाबद्दल अभिनंदन. भारताच्या अंतराळ प्रवासातील हा एक निर्णायक क्षण आहे. आपल्या खाजगी क्षेत्राचा वाढता सहभाग नवनवीन संधी निर्माण करत आहे आणि अभिनवतेला गती देत आहे. हे यश असंख्य तरुणांना मोठी स्वप्ने पाहण्यासाठी आणि निर्भयपणे नवनिर्मिती करण्यासाठी प्रेरणा देईल.

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान



राष्ट्राच्या सर्वांगीण विकासातील भागीदार...

क्रीडा शक्ती

भारतात ऑगस्ट महिना हा क्रीडा उत्सवांचा महिना बनला आहे. 29 ऑगस्ट रोजी देश राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करेल, जो 'फिट इंडिया' मोहिमेचा 7 वा वर्धापन दिन देखील आहे. 'फिट इंडिया' चळवळीने देशात आरोग्य आणि तंदुरुस्तीबद्दल जागरूकता आणि सक्रियता वाढवली आहे. म्हणूनच केंद्र सरकार "राष्ट्र उभारणीसाठी क्रीडा: राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा शक्तीचा उपयोग" या राष्ट्रीय क्रीडा धोरण 2025 च्या दृष्टिकोनाच्या 5 स्तंभांद्वारे क्रीडा परिसंस्था बळकट करत आहे.

भारत दरवर्षी 29 ऑगस्ट रोजी, प्रसिद्ध हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीदिनी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करतो. भारताला 2036 पर्यंत जगातील पहिल्या 10 क्रीडा राष्ट्रांमध्ये आणि 2047 पर्यंत पहिल्या 5 राष्ट्रांमध्ये स्थान प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने देश खेळाडू तयार करत असताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी नागरिकांची तंदुरुस्ती हे एक विशेष प्राधान्य आहे. 'फिट इंडिया' चळवळ 2019 मध्ये सुरू करण्यात आली. आता, ही मोहीम देशात एक व्यापक तंदुरुस्ती क्रांती बनली आहे. गेल्या वर्षी, 'फिट इंडिया 2025' मध्ये क्रीडा आणि तंदुरुस्तीच्या देशव्यापी उत्सवात 35 कोटींहून अधिक लोक सहभागी झाले होते.

सध्याच्या केंद्र सरकारने 10 जुलै, 2025 रोजी 'खेलो भारत धोरण 2025' सुरू केले. राष्ट्रीय क्रीडा धोरण, 2001 ची जागा आता या नवीन धोरणाने घेतली आहे. देशाला जागतिक क्रीडा महासत्ता म्हणून स्थापित करण्यासाठी आणि 2036 च्या ऑलिम्पिक खेळांसह आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आयोजनात उत्कृष्ट कामगिरी करण्याच्या उद्देशाने या धोरणात एका 5 स्तंभीय दृष्टिकोनावर कार्यवाही सुरू केली आहे. हे धोरण अधिक निरोगी, अधिक सक्रिय आणि सक्षम नागरिक घडवेल.

स्तंभ-1

जागतिक स्तरावरील उत्कृष्टता

या स्तंभांतर्गत, खेलो इंडिया – राष्ट्रीय क्रीडा विकास कार्यक्रम, राष्ट्रीय क्रीडा महासंघांना सहाय्य, राष्ट्रीय क्रीडा विकास निधी तसेच राष्ट्रीय क्रीडा विज्ञान आणि संशोधन केंद्र यांवर काम केले जात आहे.

28,234

खेळाडूंना देशभरात अधिसूचित असलेली 1066 खेलो इंडिया केंद्र प्रारंभिक प्रशिक्षण देत आहेत.

12,000

हून अधिक खेळाडूंना 23 राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्रे आणि 50 हून अधिक उच्च कार्यक्षमता प्रशिक्षण केंद्रे सहाय्य पुरवत आहेत.

35

खेलो इंडिया राज्य उत्कृष्टता केंद्रे 34 राज्यांमधील 2,466 खेळाडूंना उच्च-कार्यक्षमतेसाठी सहाय्य प्रदान करत आहेत.

₹6.28 लाख

रुपये वार्षिक निधी सर्वसमावेशक प्रशिक्षण सहाय्याचा भाग म्हणून प्रत्येक खेलो इंडिया खेळाडूला प्रदान केला जात आहे.

इंदिरा गांधी स्टेडियम येथे राष्ट्रीय क्रीडा विज्ञान आणि संशोधन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे.

स्तंभ-2

आर्थिक विकासासाठी क्रीडा

राष्ट्रीय क्रीडा धोरण 2025 मध्ये क्रीडा क्षेत्राच्या आर्थिक क्षमतेवर भर देण्यात आला आहे. भारतात प्रमुख आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्याच्या प्रयत्नांसोबतच, क्रीडा उत्पादन परिसंस्थेला बळकट करण्यासाठी आणि खाजगी सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

322

खेलो इंडिया मान्यताप्राप्त अकादमींना (खाजगी सुविधांसह) उच्च दर्जाची प्रतिभा जोपासण्यासाठी प्रमाणित करण्यात आले आहे.

2030

मध्ये युवा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा आणि 2036 च्या ऑलिम्पिक स्पर्धांच्या यजमानपदासाठी बोली लावली आहे. भारताने अद्याप ऑलिम्पिक स्पर्धांचे आयोजन केलेले नाही.

2025 मध्ये, भारताने नवी दिल्ली येथे पहिल्या खो-खो विश्वचषकाचे आयोजन केले आणि पुरुष व महिला दोन्ही गटांमध्ये विजेतेपद पटकावले.

2025 मध्ये 12व्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपचे आयोजन करण्यात आले होते. भारताने आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी करत, सहा सुवर्णांसह एकूण 22 पदके जिंकली.

- भविष्यात ऑलिम्पिक आणि पॅरा-ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्याची आपली महत्त्वाकांक्षा लक्षात घेऊन, भारताचे ऑस्ट्रेलियासोबत एका रुपरेषेवर काम सुरू आहे.
- 500 कोटी रुपयांच्या क्रीडा साहित्य निर्मिती उपक्रमाची घोषणा 2026-27 च्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. यामध्ये क्रीडा क्षेत्राला रोजगार, कौशल्य विकास आणि आर्थिक वाढीचा प्रमुख चालक म्हणून स्थान देण्यात आले आहे.

स्तंभ-3

सामाजिक विकासासाठी खेळांचा वापर

महिला,आदिवासी समुदाय तसेच दिव्यांगजन यांच्यामध्ये सहभाग, देशी तसेच पारंपरिक खेळांना प्रोत्साहन देणे आणि खेळांना कारकिर्दीच्या पर्यायाच्या रुपात स्थापित करण्याचे काम केंद्र सरकार करत आहे.

2,600

हून अधिक अस्मिता लीग (महिला लीग)चे खेलो इंडिया अंतर्गत आयोजन, 34 प्रकारच्या खेळांमध्ये 3 लाखांहून अधिक महिला होत आहेत सहभागी.

गेल्या 5 वर्षांमध्ये, राष्ट्रीय पातळीवरील क्रीडास्पर्धांमध्ये योगासने, खो-खो तसेच कबड्डी या तीन देशी खेळांचा समावेश करण्यात आला आहे. खेलो इंडिया युथ गेम्स तसेच खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स या स्पर्धांच्या अनेक भागांमध्ये मल्लखांब, थांग-ता, कलरीपयट्टू, गटका तसेच योगासने या खेळांचा समावेश करण्यात आला आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प **2026-27** मध्ये जाहीर करण्यात आलेल्या खेलो इंडिया अभियानामुळे देशाच्या क्रीडाविषयक परिसंस्थेत मोठे परिवर्तन घडून येईल.

स्तंभ-4

खेळांना दिले लोकचळवळीचे स्वरुप

देशव्यापी अभियाने तसेच समुदायांवर आधारित कार्यक्रमांच्या माध्यमातून खेळांमध्ये लोकसहभागाच्या आणि तंदुरुस्तीच्या संस्कृतीला चालना देण्याचे कार्य गेल्या काही वर्षांमध्ये वेगाने करण्यात येत आहे. क्रीडासंबंधी सुविधा सर्वांपर्यंत पोहोचवण्याला चालना देण्यात येत आहे.

- लोकसभा स्तरावर खासदार क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात येत आहेत.
- 4.40 लाखांहून अधिक शाळा फिट इंडिया अभियानात नोंदणीकृत आहेत.
- फिट इंडिया अभियानांतर्गत वर्षभर 'संडे ऑन सायकल्स', फिट इंडिया स्वच्छता स्वातंत्र्य दौड, फिट इंडिया आनंदोत्सव मेळाव्यांचे आयोजन करण्यात येत आहे.
- तंदुरुस्तीसंबंधी मानकांचा मागोवा घेणारे फिट इंडिया मोबाईल ॲप 13 लाखांहून अधिक वेळा डाऊनलोड करण्यात आले आहे.



स्तंभ-5

शिक्षणासह एकत्रीकरण (एनईपी 2020)

राष्ट्रीय क्रीडा धोरणात लहानपणापासूनच शारीरिक शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. आयुष्यभर तंदुरुस्ती तसेच हिताला चालना देण्यासाठी खेळांना एक एकीकृत विषय मानणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) 2020 ला हे अनुरूप आहे.

- एनईपी 2020 मध्ये खेळ आणि शारीरिक शिक्षणाला शिक्षण प्रणालीचे अभिन्न अंग मानण्यात आले आहे. आता विद्यार्थ्यांना खेळ आणि अभ्यास अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये प्रगती करण्याची संधी मिळेल.
- शैक्षणिक पातळीवर खेळाडू आणि विद्यार्थी यांच्यासाठी विशेष अभ्यासक्रम तयार करण्यात येत आहेत.
- आयआयटीसारख्या प्रतिष्ठित शिक्षण संस्थांमध्ये देखील पहिल्यांदाच क्रीडा कोटा राखीव ठेवण्याची सुरुवात करण्यात आली आहे.

राष्ट्रीय क्रीडा धोरण लागू करण्याचा देखील आराखडा निश्चित करण्यात आला आहे

जागतिक पातळीवर मान्यताप्राप्त, खेळाडू-केंद्रित प्रशासकीय पायाभूत सुविधा उभारण्याचे काम केंद्र सरकारने सुरु केले आहे.राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम, 2025 अधिसूचित केल्यानंतर सरकारने इतर काही प्रशासकीय सुधारणा तसेच पारदर्शकता विषयक कायदे देखील अधिसूचित केले आहेत.

'एक खेळ-एक कॉर्पोरेट' धोरणाची देखील घोषणा करण्यात आली असून क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी क्रीडा महासंघांकडून पाठबळ घेणे आणि आर्थिक मदत आकर्षित करणे हा या धोरणाचा उद्देश आहे.

ऑलिम्पिक तसेच क्रीडा चळवळीचे सुशासन, नैतिकता तसेच खेळांच्या निष्पक्ष कार्यपद्धतीवर आधारित एका व्यापक कायदेशीर चौकटीच्या माध्यमातून राष्ट्रीय क्रीडा संस्थांमध्ये जबाबदारी, पारदर्शकता तसेच सुशासन यांना चालना देणे हा खेळांचे नवे अधिनियम आणि नियम यांचा उद्देश आहे.

राष्ट्रीय क्रीडा धोरण 2025 हे राज्यांसाठी एक आदर्श क्रीडा धोरण आहे जे त्यांना राष्ट्रीय हितांची काळजी घेऊन राज्य क्रीडा धोरण तयार करण्यासाठी प्रेरित करेल.

भारतीय बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधू हिने जपान ओपन 2026 चे विजेतेपद पटकावून इतिहास रचला. सिंधू हे जेतेपद पटकावणारी पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे.

भारतीय खेळाडू फडकावत आहेत तिरंगा

- 19 वर्षांखालील पुरुषांच्या आयसीसी क्रिकेट विश्वचषक 2026 स्पर्धेत विक्रम रचत भारताने सहाव्यांदा अजिंक्यपद पटकावले.
- भारताने 2025 मध्ये खो-खो विश्वचषक स्पर्धेत महिला आणि पुरुष अशा दोन्ही गटांमध्ये सुवर्ण पदकाची कमाई केली.
- सेपोक-टकरा विश्वचषक 2025 मध्ये भारतीय पथकाने 7 पदके जिंकली.
- भारतीय महिला क्रिकेट संघाने पहिल्यांदाच आयसीसी महिला विश्वचषक 2025 स्पर्धा जिंकली.
- 19 वर्षांखालील महिलांच्या आयसीसी क्रिकेट विश्वचषक 2026 स्पर्धेत भारतीय संघाने विजय नोंदवला.
- भारतीय नेत्रहीन महिला क्रिकेट संघाने पहिला नेत्रहीन महिला टी-20 विश्वचषक 2025 जिंकताना संपूर्ण मालिकेदरम्यान अजिंक्य राहण्याचा विक्रम नोंदवला.

"भारतीय बॅडमिंटन क्षेत्राची एक ऐतिहासिक कामगिरी! जपान खुल्या बॅडमिंटन स्पर्धा 2026 मध्ये विजयी झाल्याबद्दल पी व्ही सिंधू यांचे अभिनंदन. या संपूर्ण स्पर्धेदरम्यान सिंधूचा दृढनिश्चय आणि असामान्य कौशल्य दिसून आले. हा किताब जिंकणारी ती पहिली भारतीय खेळाडू असल्यामुळे हे यश आणखीनच विशेष आहे. हे यश देशभरातील असंख्य तरुण खेळाडूंना हा खेळ खेळण्यासाठी आणि चमकदार कामगिरी करण्यासाठी प्रेरित करेल."

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान

राष्ट्रकुल क्रीडास्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंनी वाढवली देशाची प्रतिष्ठा

भारताने 13 सुवर्ण पदकांसह एकूण 39 पदकांची कमाई केली

स्कॉटलंडमध्ये ग्लासगो येथे आयोजित राष्ट्रकुल क्रीडास्पर्धा 2026 मध्ये भारताने चमकदार कामगिरी करत 13 सुवर्ण आणि 17 रौप्य पदकांसह एकूण 39 पदके जिंकली. या यशस्वी सादरीकरणाच्या जोरावर भारताने पदक तालिकेत चौथे स्थान पटकावले. भारतीय खेळाडूंनी मिळवलेल्या या यशाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिमानाची भावना व्यक्त केली असतानाच, वर्ष 2030 मध्ये होऊ घातलेल्या राष्ट्रकुल स्पर्धांच्या शतकमहोत्सवी वर्षीच्या आयोजनाचे यजमानपद भूषवण्यासाठी संपूर्ण तयारी आणि निर्धारासह भारत आगेकूच करत आहे...

पदक तालिका

सुवर्ण **13**

रौप्य **17**

कांस्य **9**

एकूण **39**

स्थान	देश	सुवर्ण	रौप्य	कांस्य	एकूण
1.	ऑस्ट्रेलिया	70	45	56	171
2.	इंग्लंड	29	45	36	110
3.	कॅनडा	19	20	23	62
4.	भारत	13	17	9	39
5.	स्कॉटलंड	13	09	17	39

राष्ट्रकुल क्रीडास्पर्धा 2026 चा दिमाखदार समारोप

स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे पार पडलेल्या 2026 च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांच्या दिमाखदार समारोप समारंभात भारताचा सांस्कृतिक वारसा आणि 2030 मध्ये आगामी स्पर्धांचे यजमानपद अहमदाबाद शहराकडे सोपवल्याचा बोलबाला दिसून आला. यावेळी सादर झालेल्या नेत्रदीपक सोहोळ्यातील भारताच्या दिमाखदार सांस्कृतिक कार्यक्रमांनी प्रेक्षकांची मने जिंकली आणि राष्ट्रकुल क्रीडास्पर्धांच्या पुढील अध्यायासाठी अहमदाबाद शहराच्या यजमानपदाची औपचारिक घोषणा देखील झाली.

समारोप समारंभात जेव्हा, वंदे मातरम्', 'शिव स्तोत्र' तसेच 'सुनो गौर से दुनियावालों' यांसारख्या गीतांचे सूर संपूर्ण आसमंतात घुमले तेव्हा भारतीय चाहत्यांनी तिरंगा फडकावत आनंद व्यक्त केला. मोठ्या संख्येतील परदेशी प्रेक्षकांनी देखील भारतीय संगीत तसेच सांस्कृतिक सादरीकरणाचा आस्वाद घेतला. या दरम्यान, ग्लासगोकडून अहमदाबादकडे राष्ट्रकुल क्रीडास्पर्धांच्या यजमानपदाच्या हस्तांतरणाचे भावनिक आणि प्रतीकात्मक दृश्य सादर करण्यात आले.

समारोप सोहोळ्यात राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचा ध्वज औपचारिकरित्या गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यासोबतच अहमदाबाद शहराने 2030 मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांच्या यजमानपदाची जबाबदारी अधिकृतरीत्या स्वीकारली. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांच्या इतिहासात 2030 मध्ये अहमदाबाद येथे होणाऱ्या स्पर्धांना विशेष महत्त्व आहे कारण या वर्षी या स्पर्धांच्या आयोजनाचे शताब्दी वर्ष असेल. तसेच भारत हा ऑस्ट्रेलियानंतरचा राष्ट्रकुल स्पर्धांचे दोनदा आयोजन करणारा जगातील दुसरा देश असणार आहे.

2030 मध्ये भारतात अहमदाबाद येथे होणार पुढील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचे आयोजन

मुष्टियुद्धात भारताने केली सर्वोत्तम कामगिरी

भारतीय मुष्टियोद्ध्यांनी 7 सुवर्ण आणि 3 रौप्य पदकांसह एकूण 10 पदकांची कमाई केली. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांच्या इतिहासात, भारताची मुष्टियुद्धातील सर्वात यशस्वी कामगिरी ठरली आहे. भारतीय खेळाडूंनी भारोत्तोलन, ज्युडो, मुष्टियुद्ध या खेळांतील उत्कृष्ट कामगिरीसह पॅरा क्रीडा प्रकारांमध्ये देखील दिमाखदार यश मिळवले.

पदके जिंकून वाढवली देशाची प्रतिष्ठा

ग्लासगो येथे झालेल्या राष्ट्रकुल 2026 क्रीडास्पर्धा मर्यादित क्रीडाप्रकारांसह आयोजित झाल्या. यामध्ये भारतातील अनेक पारंपरिक आणि बलवान खेळांचा समावेश नव्हता. असे असूनही, भारतीय पथकाने बर्मिंगहॅम 2022 स्पर्धांमध्ये त्याच खेळांमध्ये जिंकलेल्या 30 पदकांच्या तुलनेत यावेळी 39 पदके जिंकून उल्लेखनीय यश मिळवले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे दूरदर्शी नेतृत्व, खेळांप्रती त्यांची कटिबद्धता आणि खेळाडूंना सातत्याने देण्यात येत असलेले प्रोत्साहन यामुळे भारतीय खेळांची वाढती प्रतिष्ठा आणि जागतिक पातळीवर देशाचे स्थान भक्कम झालेले आज सुस्पष्टपणे दिसून येत आहे.

ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडास्पर्धेत आपल्या पथकाने केलेल्या कामगिरीबद्दल अभिमान वाटतो आहे. भारताने 13 सुवर्णपदकांसह एकूण 39 पदके जिंकल्याबद्दल अत्यंत आनंद झाला. या संपूर्ण स्पर्धेदरम्यान आपल्या प्रतिभावंत क्रीडापटूंनी असामान्य कौशल्य, दृढनिश्चय आणि समर्पणभावाचे दर्शन घडवले. त्यांचे परिश्रम आपल्या तरुणांना सतत प्रेरणा देत राहतील. माझ्यातर्फे भारतीय खेळाडूंना त्यांच्या भावी कामगिरीसाठी मनापासून शुभेच्छा.

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान

वर्ष 2024 साठी 72 वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जाहीर

'आर्टिकल 370' ने पटकावला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार

2024 वर्षासाठीच्या 72 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांच्या विजेत्यांची घोषणा 18 जुलै रोजी करण्यात आली. 'आर्टिकल 370'ला सर्वोत्कृष्ट फीचर फिल्म, तर 'भंगार'ला सर्वोत्कृष्ट नॉन-फीचर फिल्म आणि 'राम-नामी'ला सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा पुरस्कार मिळाला...

वर्ष 2024 च्या 72 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात कार्तिक आर्यन आणि मामूटी यांना अनुक्रमे 'चंदू चॅम्पियन' आणि 'ब्रह्मयुगम' साठी सर्वोत्कृष्ट अभिनेता (मुख्य भूमिका) पुरस्कार मिळाला. यामी गौतमला 'आर्टिकल 370' साठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्री (मुख्य भूमिका) पुरस्कार मिळाला. रणदीप हुड्डाला 'स्वातंत्र्यवीर सावरकर' साठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पदार्पणातील पुरस्कार मिळाला. 'कल्की 2898 एडी', 'आमरण', 'पुष्पाः द रूल पार्ट 2', 'भूल भुलैया 3' आणि 'स्त्री 2' यांसारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटांनीही मोठे पुरस्कार पटकावले, जे भारतीय चित्रपटसृष्टीची विविधता आणि उत्कृष्ट गुणवत्ता दर्शवतात.

फीचर फिल्म ज्युरीचे अध्यक्ष जयराज, नॉन-फीचर फिल्म ज्युरीचे अध्यक्ष असीम सिन्हा आणि सर्वोत्कृष्ट चित्रपट लेखन ज्युरीचे अध्यक्ष ए. चंद्रशेखर यांनी पुरस्कारांची घोषणा केली. राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार हे भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च आणि सर्वात प्रतिष्ठित सन्मान आहेत. भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाद्वारे आयोजित केला जाणारा हा वार्षिक सोहळा भारतीय चित्रपटसृष्टीची विविधता, कलात्मकता आणि सामाजिक प्रासंगिकता यांचा उत्सव आहे.

72 वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

यामी गौतमला मिळाला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार

'आर्टिकल 370' ला मिळाला सर्वोत्कृष्ट फीचर फिल्मचा पुरस्कार

कार्तिक आर्यन आणि मामूटी यांना 'चंदू चँपियन' आणि 'ब्रह्मयुगम' साठी सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार



कार्तिक आर्यन

मामूटी



रणदीप हुड्डाला 'स्वातंत्र्यवीर सावरकर' साठी पदार्पण (डेब्यू) दिग्दर्शक पुरस्कार

सर्वोत्कृष्ट नॉन-फीचर फिल्म पुरस्कार 'भंगार' ला

'राम-नामी' ला सर्वोत्कृष्ट माहितीपट पुरस्कार



- राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये ब्लॉकबस्टर चित्रपट 'कल्की 2898 एडी', 'पुष्पा: द रूल पार्ट-02', 'स्त्री 2' आणि 'आमरण' यांचा दबदबा

ज्यांनी आत्मसमर्पणाऐवजी निवडले आत्मबलिदान

गुलामगिरीच्या जोखडातून देशाला मुक्त करणाऱ्यांमध्ये आणि ब्रिटिश जुलुमाविरुद्ध संघर्ष करणाऱ्यांमध्ये वीरांगना अवंतीबाई लोधी यांचे स्थान विशेष आहे. 1857 च्या आंदोलनात अग्रगण्य भूमिका बजावणाऱ्या राणी अवंतीबाईंनी केवळ सुशासनाची स्थापना करण्याचा आदर्शच मांडला नाही, तर त्या आयुष्यभर मातृभूमीच्या स्वाभिमानासाठी कटिबद्ध राहिल्या. त्यांची जीवनगाथा देशाला सदैव वाटेल अभिमानास्पद...

जन्म - 16 ऑगस्ट, 1831 ■ मृत्यू- 20 मार्च, 1858

मध्य राष्ट्रगौरवाचे अमर प्रतीक असलेल्या अवंतीबाई यांचा जन्म 16 ऑगस्ट 1831 रोजी मध्य प्रदेशातील सिवनी येथे झाला. त्यांचे वडील जुझार सिंग यांनी लहानपणापासूनच त्यांना तलवारबाजी, नेमबाजी आणि घोडेस्वारीचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. राजकुमारी मोठी झाल्यावर त्यांचा विवाह रामगढचे राजा लक्ष्मण सिंग लोधी यांचे पुत्र राजकुमार विक्रमादित्य यांच्याशी झाला. राजाच्या आजारपणामुळे आणि अल्पवयीन मुलांमुळे राणीला राज्याची सूत्रे हाती घ्यावी लागली. त्या एक कार्यक्षम प्रशासक म्हणून सिद्ध झाल्या. त्या काळात देशातील संस्थाने ताब्यात घेण्यासाठी इंग्रज विविध नियम लागू करत होते. "विलिनीकरणाच्या धोरणा"अंतर्गत, ब्रिटिशांनी रामगढ ताब्यात घेण्यासाठी "कोर्ट ऑफ वॉर्ड्स"ची नियुक्ती केली. या परिस्थितीत राणी अवंतीबाईंनी बंडाचे निशाण उभारले. त्यांनी आजूबाजूच्या राजांना आणि जमीनदारांना एकत्र करण्यासाठी पत्रे आणि बांगड्यांचे संदेश पाठवले आणि त्या क्रांतीचे एक अद्वितीय प्रतीक बनल्या. त्यांनी पत्रात लिहिले होते, "ब्रिटिशांशी लढायला तयार रहा किंवा बांगड्या घालून घरी बसा." 1857 च्या स्वातंत्र्य युद्धात ब्रिटिश राजवटीविरुद्ध तरुणांना संघटित करून त्यांनी अतुलनीय नेतृत्व दाखवले. खैरीच्या लढाईत त्यांनी आपल्या बुद्धीचा वापर करून ब्रिटिश सेनापती वॅडिंग्टनला माघार घेण्यास भाग पाडले आणि आपला प्रदेश मुक्त केला. तसेच अनेक प्रदेश मुक्त करून त्यांनी आपले शौर्य आणि दृढनिश्चय दाखवून दिला. एवढेच नाही तर, इंग्रजाच्या विशाल सैन्याने वेढा घातला असता देवहारगड डोंगरावर त्या शौर्याने लढल्या. 20 मार्च 1858 रोजी जेव्हा त्यांना वाटले की इंग्रज त्यांना पकडतील तेव्हा त्यांनी स्वतःच्याच तलवारीने स्वतःच्या जीवनाचा त्याग केला आणि देशासाठी सर्वोच्च बलिदान दिले.

> *शूर राणी अवंतीबाई लोधी यांचे जीवन हे शौर्य, त्याग आणि देशभक्तीचे एक अद्वितीय उदाहरण आहे. 1857 च्या स्वातंत्र्ययुद्धादरम्यान त्यांनी इंग्रजांविरुद्ध शौर्याने लढा दिला आणि शरणागती पत्करण्याऐवजी हौतात्म्य स्वीकारले. त्यांचे बलिदान हा राष्ट्रनिष्ठा आणि आत्मसन्मानाचा एक अमर संदेश आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आम्ही त्यांना आदराने वंदन करतो.*
>
> **– अमित शाह, केंद्रीय गृह मंत्री**

देशाचा सन्मान आणि स्वातंत्र्य जपण्यासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या अवंतीबाईंना 'भारताची जोन ऑफ आर्क' म्हणून ओळखले जाते. त्या स्त्रीशक्ती आणि आत्मसन्मानाचे एक अमर प्रतीक आहेत. भारतीय टपाल विभागाने त्यांच्या सन्मानार्थ एक स्मारक टपाल तिकीट जारी केले आहे. जबलपूरमधील बर्गी धरणाला त्यांच्या सन्मानार्थ 'राणी अवंतीबाई सागर' असे नाव देण्यात आले आहे. ■

Narendra Modi
@narendramodi

गेल्या 12 वर्षांत आमच्या सरकारने आरोग्यसेवा क्षेत्रात देशाचे सामर्थ्य वाढवले असल्याने लोकांना वैद्यकीय उपचारांच्या अधिकाधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होत आहेत. आमच्या प्रयत्नांचा एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे भारत हे वैद्यकीय पर्यटनासाठी एक प्रमुख ठिकाण बनत आहे.

Rajnath Singh
@rajnathsingh

राष्ट्रीय सुरक्षा ही केवळ सैनिकांची जबाबदारी नाही; त्यासाठी प्रत्येक नागरिकामध्ये सैनिकवृत्ती असणे आवश्यक आहे. प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्र प्रथमची भावना, शिस्त आणि कर्तव्यनिष्ठा सदैव जागृत असली पाहिजे.

Amit Shah
@AmitShah

'हर घर तिरंगा' अभियानाने संपूर्ण देशाला राष्ट्रभावनेने जोडले आहे. या वर्षीही आपण हे अभियान एका जनआंदोलनाच्या रूपात पूर्ण उत्साहाने आणि आदराने पुढे नेले पाहिजे: पीएम श्री @narendramodi जी

Nitin Gadkari
@nitin_gadkari

महाराष्ट्राच्या भविष्याच्या कनेक्टिविटीचे नवीन प्रतीक बनेल तळेगाऊ-चाकण-शिक्रापूर कॉरिडॉर !

#PragatiKaHighway #GatiShakti

Nirmala Sitharaman Office
@nsitharamanoffc

भारताकडे प्रतिभा आणि क्षमतेची काहीही कमतरता नाही. याच सामर्थ्यामुळे भारत जागतिक क्षमता केंद्रांसाठी (जीसीसी) एक पसंतीचे ठिकाण बनले आहे.

जगभरातील कंपन्या भारतीय लोकांचे कौशल्य, सर्जनशीलता आणि शहाणपण यामुळे इथे येत आहेत.

कला, परंपरा आणि संस्कृती या क्षेत्रांमध्येही अशीच एक मोठी संधी साकार होण्याची प्रतीक्षा करत आहे.

भारताचा कलात्मक वारसा ही एक अद्वितीय क्षमता आहे, जी जागतिक बाजारपेठेत आपली छाप सोडण्यास पूर्णपणे सज्ज आहे.

Kiren Rijiju
@KirenRijiju

18 जुलै रोजी एका तरुण भारतीय स्टार्टअपने एक मोठा टप्पा गाठला. जगात फारच कमी देश आहेत जिथे असे खाजगी साहस पाहायला मिळाले आहे आणि भारतीय तरुणांनी अंतराळात झेप घेतली आहे: माननीय पंतप्रधान श्री @narendramodi जी

#Parliament
#MonsoonSession2026

प्रधानमंत्री मोदी ने वीडियो संदेश में दिए सुझावों के लिए युवाओं को दिया धन्यवाद

नई दिल्ली, 8 दि : प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी ने शुक्रवार रात एक बार फिर वीडियो संदेश के जरिये युवाओं के सामने अपनी बात रखी। उन्होंने पैरा लीक के मुद्दे पर गुरुवार रात जारी अपने वीडियो पर सकारात्मक प्रतिक्रिया एवं सुझाव देने के लिए, युवाओं को धन्यवाद दिया।

पीएम ने गुरुवार को भी वीडियो संदेश के लिए आधी रात का वक्त चुना था और जेन-जी को ट्रेंड्स करकर संबोधित किया था। शुक्रवार को उन्होंने अपने संबोधन की शुरुआत 'थैंक्यू ट्रेंड्स से की। जनसभाओं में कभी स्थानीय बोली, तो कभी पहनावे से जनता के साथ संवाद स्थापित करने के लिए जाने जाने वाले प्रधानमंत्री ने जब जेन-जी से संवाद स्थापित किया तो उन्होंने उनकी ही शैली और उनके समय को चुना। पीएम ने शुक्रवार रात करीब 11.30 बजे जारी वीडियो संदेश में कहा, 'धन्यवाद ट्रेंसर्स, कल देर रात आपसे मिलने का मौका मिला था। मैंने जो वीडियो पोस्ट किया था, उस पर आपने जो प्रतिक्रिया दी, सकारात्मक सुझाव दिए, उसके लिए सभी को धन्यवाद।'

मोदी ने उनके पिछले वीडियो को देखने व सुझाव भेजने के लिए धन्यवाद देते हुए वीडियो संदेश साझा किया। प्रेट

दो घंटे में ही प्रधानमंत्री के 12 लाख फालोअर बढ़े

पीएम खुद कमान संभाल चुके हैं। छात्रों से संवाद करते हुए उन्होंने पोस्ट किए और बताया कि सरकार परीक्षा व्यवस्था को दुरुस्त कर रही है। उसके बाद 12 घंटे में ही पीएम के 12 लाख फालोअर बढ़ गए।

पीएम के वीडियो ने बनाया विश्व रिकार्ड : पीएम के गुरुवार देर रात जारी वीडियो ने 24 घंटे के भीतर सबसे अधिक बार देखे जाने का विश्व रिकार्ड बनाया है। इसे 30.3 करोड़ बार देखा गया और 16 लाख से अधिक लाइक्स मिले। इससे पहले किसी रील को 24 घंटे में 30 करोड़ बार देखे जाने का रिकार्ड था।

केमिकल और रेल कनेक्टिविटी पर केंद्रीय कैबिनेट के 2 अहम फैसले

3,030 करोड़ से देश में 3 बड़े केमिकल पार्क बनाएगी सरकार, आयात पर निर्भरता घटेगी

भास्कर न्यूज | नई दिल्ली

केंद्र सरकार देश में तीन बड़े केमिकल पार्क बनाएगी। पीएम नरेंद्र मोदी की अध्यक्षता में हुई कैबिनेट बैठक में 3,030 करोड़ की भव्य-रसायन योजना को मंजूरी दी गई। योजना 2026-27 से 2030-31 तक चलेगी। प्रत्येक पार्क कम से कम 2,000 एकड़ में बनेगा। केंद्र हर पार्क के लिए अधिकतम 1,000 करोड़ रु. देगा। संबंधित राज्य सरकार को कम से कम 500 करोड़ रु. लगाने होंगे।

पार्कों में कॉमन एफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट, खतरनाक कचरे के निपटान, पानी, सॉल्वेंट रिकवरी, स्टीम नेटवर्क, पाइपलाइन,

ग्लासगो में झंडू कुमार ने पैरा पावरलिफ्टिंग में जीता ब्रॉन्ज

सारनाथ यूनेस्को विश्व धरोहर सूची में शामिल, बौद्ध विरासत को मिली पहचान

28 वर्षों के इंतजार के बाद मिला दर्जा | **58** साल की यात्रा के बाद यूनेस्को तक पहुंचा सारनाथ, अमेरिका से शुरू हुई थी पहल, वीटचयू की रिसर्च बनी आधार, देश की 45वीं विश्व धरोहर

1999 में हुई भगवान बुद्ध के 28 रूपों की प्राण प्रतिष्ठा

हर भारतीय के लिए यह गर्व का पल : पीएम मोदी

हाइड्रोजन-चालित वाहनों के लिए 12 परियोजनाओं को मिली मंजूरी

नई दिल्ली, 8 दि : नेशनल ग्रीन हाइड्रोजन मिशन के तहत 70 हाइड्रोजन-चालित वाहनों के लिए 12 पायलट परियोजनाओं को 410.77 करोड़ की वित्तीय सहायता के साथ मंजूरी दी गई है। केंद्रीय नवीन और नवीकरणीय ऊर्जा राज्य मंत्री एसवाई नाइक ने लोकसभा में बुधवार को यह जानकारी दी।

इन परियोजनाओं में 27 बसें और 43 ट्रक शामिल हैं। इनमें फ्यूल सेल इलेक्ट्रिक वाहन (एफसीईवी) व हाइड्रोजन आंतरिक दहन इंजन (एच-आईसीई) वाहन शामिल हैं। इसके साथ ही विभिन्न राज्यों में 21 मार्गों पर 16 हाइड्रोजन ईंधन भरने के स्टेशन (एचआरएस) भी स्थापित किए जाएंगे। इन परियोजनाओं के लिए कुल वित्तीय सहायता लगभग 410.77 करोड़ रुपये निर्धारित की गई है, जिसमें से 41.582 करोड़ रुपये पहले ही जारी किए जा चुके हैं। मंत्री ने बताया कि ये पायलट परियोजनाएं निजी और सार्वजनिक दोनों क्षेत्रों द्वारा की जा रही हैं।

माइक्रोप्लास्टिक प्रदूषण का कारण नदियों का पानी

केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह ने एक लिखित उत्तर में बताया कि अध्ययन दर्शाते हैं कि भारतीय तटों पर माइक्रोप्लास्टिक प्रदूषण का मुख्य कारण नदियों का पानी और बेकार हुए मछली पकड़ने के उपकरण हैं। पृथ्वी विज्ञान मंत्रालय राष्ट्रीय तटीय अनुसंधान केंद्र इस कचरे पर नजर रखता है।

सर्वाधिक बाघ भारत में होने पर गर्व : मोदी

नई दिल्ली। प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने बुधवार को वैश्विक बाघ दिवस पर बधाई दी। उन्होंने कहा कि देश के लिए यह गर्व की बात है कि दुनिया के 70 फीसदी बाघ भारत में हैं। यह भारत के प्रकृति और वन्यजीव संरक्षण के संकल्प को दर्शाता है। प्रधानमंत्री ने एक्स पर एक पोस्ट में कहा कि केंद्र सरकार विज्ञान-आधारित

परीक्षा सुधारों के लिए पीएम मोदी ने बनाई उच्च स्तरीय टास्क फोर्स

शिक्षा का आधार सुधारेंगे नीलेकणि, टीम में स्पेस, इंटेलिजेंस और टेक के दिग्गज

टास्क फोर्स चार बिंदुओं पर तैयार करेगा रोडमैप

लीक-प्रूफ परीक्षा चक्रव्यूह बनाएंगे ये छह एक्सपर्ट

आधार-यूपीआई के जरिये लाए ऐतिहासिक बदलाव

कम बजट और जीरो एरर के साथ चांद तक पहुंचाया

इंडियन मुजाहिदीन का आतंकी नेटवर्क ध्वस्त किया

चिप डिजाइन में देश की आत्मनिर्भरता की रखी नींव

सीबीएसई में क्षमता आधारित मूल्यांकन प्रणाली लाई

अटल बिहारी वाजपेयी यांची पुण्यतिथी

राष्ट्राचे वंदन (16 ऑगस्ट)

देशाची सुरक्षा आणि जनकल्याणाला सदैव दिले प्राधान्य

सांस्कृतिक राष्ट्रवादाचे कार्यसंस्कृतीत रूपांतर करणाऱ्या अटलबिहारी वाजपेयी यांनी नेहमीच देशाची सुरक्षा आणि जनकल्याणाला प्राधान्य दिले. त्यांच्या राष्ट्रवादी विचारांनी, निर्दोष प्रतिमेने आणि समर्पित जीवनाने भारतीय राजकारणावर एक अमिट छाप सोडली. अणुचाचण्या आणि कारगिल युद्धाच्या माध्यमातून त्यांनी जगाला उदयोन्मुख भारताच्या सामर्थ्याची जाणीव करून दिली, त्याचबरोबर त्यांनी देशात सुशासनाची संकल्पनाही साकार केली. त्यांची दूरदृष्टी आणि ध्येय विकसित भारताच्या संकल्पाला निरंतर देत राहील सामर्थ्य....

- अटलजींच्या कनेक्टिव्हिटीच्या दूरदृष्टीने 21 व्या शतकातील भारताला अधिक मजबूत केले.
- त्यांनी आपले जीवन एक सशक्त, समृद्ध आणि स्वावलंबी भारत घडवण्यासाठी समर्पित केले.

सर्व देशबांधवांच्या वतीने आम्ही माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त आदरपूर्वक आदरांजली अर्पण करतो. राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी असलेले त्यांचे समर्पण आणि सेवेची भावना विकसित आणि आत्मनिर्भर भारत घडवण्यासाठी योगदान देण्यास प्रत्येकाला प्रेरित करणारी आहे.

-नरेंद्र मोदी, पंतप्रधान

न्यू इंडिया समाचार
पाक्षिक

आर.एन. आय, DELHIN/2020/78812, 16-31 ऑगस्ट, 2026

आरएनआय DELHIN/2020/78812 (प्रकाशन दिनांक 04 ऑगस्ट 2026, एकूण पृष्ठ-42)

मुख्य संपादक
धीरेन्द्र ओझा, प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

प्रकाशक
कंचन प्रसाद महासंचालक,
केंद्रीय संचार ब्यूरो

खोली क्रमांक-278, केंद्रीय संचार ब्यूरो,
सूचना भवन, दुसरा मजला,
नवी दिल्ली -110003 हून प्रकाशित